दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -७८ | रविवार दि.२३ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-78 | Sunday, Dt.23 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# बीड जिल्ह्यातील राजकारणाला मिळणार नवी कलाटणी..!

## अजित दादांच्या राष्ट्रवादीत होणार नवलाई, क्षीरसागर मुक्त नगरपालिकेसाठी पारवेच ठरणार पर्यायी ?

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या राजकारणात रोज नवीन कलाटणी मिळत आहे. अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून एक क्षीरसागर बाहेर पडल्यानंतर आता अनेक जणांची इंट्री होत आहे. बीड जिल्ह्यातील हे बदलते राजकारण नवी नवलाई निर्माण करणार आहे आणि दादांच्या राष्ट्रवादीत ही नवलाई जादूची कांडी फिरवणार आहे का ? क्षीरसागर मुक्त नगरपालिका करण्यासाठी पारवेच पर्यायी ठरणार आहेत का ? हे लवकरच स्पष्ट होणार आहे.









बीड नगरपालिकेवर अनादी कालापासून क्षीरसागर यांचे एकतर्फी वर्चस्व राहिलेले आहे. मागील काही वर्षात एक छत्र असलेल्या क्षीरसागरांचे वेगळे छत्र तयार झाले. त्यामुळे त्यांची ताकद विखुरली गेली. याचा फायदा क्षीरसागर विरोधकांनी घेण्यास सुरुवात केली आणि बीडच्या राजकारणात शिवछत्रच्या पंडितांची इंट्री झाली. त्यामुळे अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून बीड विधानसभेचे अध्यक्ष डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी बाहेर पडत भाजपाचे कमळ हातात घेतले. अचानक घडलेल्या या घडामोडीमुळे अजितदादांची राष्ट्रवादी बीडमध्ये हलली. मात्र पुन्हा एकदा नव्याने उभारी घेण्यासाठी आणि बीड जिल्ह्यात राष्ट्रवादीचे वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी आता अजितदादांनी कंबर कसली आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील माजी मंत्री शिंदे शिवसेनेतील प्रा. सुरेश नवले यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात दस्तूर खुद्द अजित दादा पवार मुंबईत प्रवेश देणार आहेत.यामुळे बीडच्या राजकारणाला नवी कलाटणी मिळणार असून दादांच्या राष्ट्रवादीमध्ये आता नवलाई नांदणार आहे.

### सना ने केली सणसणाटी

अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आमदार सना शेख यांच्या दमदार एन्ट्रीने सन सनाटी निर्माण केली आहे. आमदार सना यांनी बीड शहर पायी फिरून मतदारांना थेट आवाहन करत मुस्लिम समाजामध्ये नवचैतन्य निर्माण केल्यामुळे माहोल बदल गया है.

### पंडितांनी सुरू केले बीडच्या गल्लीतून राजकारण

गडी वरील शिवछत्रच्या पंडितांनी बीडच्या राजकारणात पहिल्यांदाच थेट गल्लीतून राजकारण सुरू केल्यामुळे आता क्षीरसागरांचे धाबे दणाणणार आहेत.बीड नगरपालिकेच्या हद्दीतील प्रत्येक मतदारांशी शिवछत्र मधून संवाद साधला जात असल्यामुळे आता पंडितांची देखील बीडच्या राजकारणात दमदार एन्ट्री झाली आहे.

### नवलेंची नवलाई रंगत आणणार..!

माजी मंत्री प्रा. सुरेश नवले एक अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून पाहिले जाते. कडवे शिवसैनिक म्हणून परिचित असलेले नवले आपल्या अभ्यासू भाषणाने क्षीरसागरांचे राजकीय वाभाडे बाहेर काढून बीड नगरपालिकेत चमत्कार घडवतील का ? त्यांना पालकमंत्री अजित दादा बूस्टर डोस देऊन आगामी राजकारणात ताकद देतील का ? यावर देखील आता चर्चा रंगात आहेत.



### पालकमंत्री अजित दादांनी बीडकडे लक्ष वेधले !

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद उपमुख्यमंत्री अजितदादांनी आपल्याकडे घेतल्यानंतर बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी राजकारण बाजूला ठेवून प्रामाणिक प्रयत्न सुरू केले.त्यांच्या पालकत्वामध्ये बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी आता स्थानिक स्वराज्य संस्थेत आपला वर चष्मा राहावा यासाठी बीड जिल्ह्याच्या राजकारणाकडे स्वतः बारकाईने लक्ष वेधल्यामुळे गुलाबी थंडीत निर्णायक वळणावर राजकारण तापणार आहे यात शंका नाही.



### बीड नगरपालिका निवडणुकीत शेख निजाम यांनी चित्रच पालटले

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत मुस्लिम मतदार बहुल संख्येने आहेत. मागील नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत थोडक्यात संधी हुकलेले शेख निजाम यांनी राजकीय डावपेच हे निजामी डावपेचात रचत निवडणुकीतील रंगतच बदलली आहे. संपादक शेख मुजीब यांच्या सासू प्रेमलता पारवे यांना उमेदवारी देऊन राजकीय समीकरणे बदलण्यात शेख निजाम हुकमी एक्का ठरले आहेत, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

### क्षीरसागर मुक्त बीड पालिका करायची असेल तर पारवे हाच एकमेव पर्याय..?

बीड नगरपालिकेची निवडणूक चौरंगी होणार यात शंका राहिलेली नाही. यामध्ये प्रामुख्याने अजित दादांची राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टी तसेच एम आय एम अशी चौरंगी लढत रंगणार आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड नगरपालिकेत नेतृत्व विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर करत आहेत. तर भारतीय जनता पार्टीचे बीड नगरपालिकेतील नेतृत्व डॉक्टर योगेश क्षीरसागर हे करत आहेत. एम आय एम चा उमेदवार हा लढतीत आहे मात्र विजयाच्या शर्तीत नाही. त्यामुळे जर बीड नगरपालिका क्षीरसागर मुक्त करायची असेल तर अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार शेख मुजीब यांच्या सासू प्रेमलता पारवे ह्या एकमेव सक्षम पर्याय ठरत असल्यामुळे बहुल मुस्लिम मतदारांमध्ये आणि मराठा समाजासह क्षीरसागर विरोधकांमध्ये सुप्त लाट सुरू झाल्यामुळे अजितदादांच्या घडीचा गजर वाढला आहे.

## गेवराई शहराच्या विकासासाठी एकहाती सत्ता द्या - आ. विजयसिंह पंडित

राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचार रॅलीला उत्स्फुर्त प्रतिसाद

गेवराई ।प्रतिनिधी

दहा वर्षे आमदारकी व पंधरा वर्षे नगर परिषदेची सत्ता यामुळे सत्तेची मस्ती चढलेल्या पवार कंपनीला त्यांची जागा दाखवून गेवराई शहराच्या सर्वांगिन विकास करण्यासाठी एकहाती सत्ता द्या असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ.शितलताई दाभाडे यांच्यासह नगरसेवक उमेदवारांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या रॅलीदरम्यान ते बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने काढण्यात आलेल्या या प्रचार रॅलीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह मतदारांनी या रॅलीमध्ये सहभाग नोंदवून गेवराईत परिवर्तन अटळ आहे असे दाखवून दिले.

गेवराई नगर परिषद निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.शितलताई महेश दाभाडे व प्रभाग क्र.५ चे उमेदवार सौ.अंजुश्री महेश मोटे व अशोक छगनराव गायकवाड यांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली प्रचार रॅली





काढण्यात आली. प्रभाग क्र.५ मधील बाजार गल्ली, दाभाडे गल्ली, मोटे गल्ली, घुंबार्डे गल्ली, रंगार चौक आदी भागांत प्रचारफेरी काढून आ. विजयसिंह पंडित यांनी मतदारांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधला.याप्रसंगी माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, प्रभाग क्र.५ चे उमेदवार सौ.अंजुश्री महेश मोटे, अशोक छगनराव गायकवाड यांच्यासह दत्ताभाऊ दाभाडे, बंडू मोटे, राहुल मोटे, वैभव दाभाडे, माऊली पंडित, विलास ठाकूर, भरत दाभाडे, महेश लवांडे, अक्षय गायकवाड, शिवा वाघमारे, विशाल दाभाडे, प्रल्हाद दाभाडे, अमोल दाभाडे, संजय दाभाडे, कुलदिप मोटे, किरण वाघमारे, बाळू खडके, सचिन पंडित, बंटी दाभाडे, बाळू दाभाडे, कृष्णा मोटे, शिवनाथ परळकर, अमर दाभाडे, किरण दाभाडे, सुभाष घुंबार्डे, अमित मुळे, गणेश गायकवाड, रोहित गायकवाड, सचिन दाभाडे, जीवन दाभाडे, ज्ञानेश्वर दाभाडे, मजहर बागवान, लंकेश मोटे, अमोल होंडे, तात्यासाहेब दाभाडे, सोहम सगळे, हैदरभाई, सचिन खेत्रे, विजयकुमार जाधव, रंजित घुंबार्डे, सुहास दाभाडे, दिनेश घोडके यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जव्हेरी समाजाचा भाजपला जाहीर पाठिंबा

### प्रभाग ७ मध्ये जगदीश गुरखुदे सर्वाधिक मतांनी विजयी होण्याची शक्यता ?



बीड ।प्रतिनिधी

बीड शहरात होत असलेल्या नगरपालिका निवडणकी मध्ये जव्हेरी समाजाने भाजपला आपला जाहिर पाठिंबा दिला आहे. समाजसेवक जगदीश गुरखुदे यांचे वार्ड क्रमांक ७ मध्ये मतदारांमध्ये उत्स्फूर्तपणे दिवसेंदिवस समर्थन वाढत असल्यामुळे ते सर्वाधिक मतांनी नगरसेवक म्हणून निवडून येतील अशी शक्यता आजच वर्तवली जात आहे.

बीड नगरपरिषद निवडणुकी मध्ये उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी चित्र स्पष्ट झाल्या नंतर प्रचाराने वेग घेतला आहे. शनिवार दुपारी १२.३० वाजता जव्हेरी समाजाने गुरुनानक दरबार मध्ये बैठक घेतली.

## कंत्राटी कर्मचारी जोगदंडने उद्धट वर्तन केल्याने सामाजिक कार्यकर्त्याने दिला चोप

**बीड ।प्रतिनिधी**

**अधिकारी आणि कर्मचारी यांनी लोकांची कामे वेळेत आणि प्रामाणिकपणे केल्यास सामान्य जनता त्या अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांना मानसन्मान देऊन डोक्यावर घेतात. मात्र मस्तवालपणा केल्यास जाग्यावर आणतात. गेवराई पंचायत समितीच्या कार्यालयात नारेगा विभागातील जोगदंड नामक कंत्राटी कर्मचाऱ्याला एका नामांकित सामाजिक कार्यकर्त्यांने उद्धट बोलल्यामुळे धडा शिकविला. झाल्या प्रकाराची मोठी चर्चा होत आहे. या प्रकरणी चौकशीची मागणी करण्यात आली आहे.**

अनेक तक्रारी असलेल्या जोगदंड यांच्याकडे मादळमोही आणि परिसरातील कामासाठी एक सामाजिक कार्यकर्ता कामासाठी गेले. काम करून देण्यासंदर्भात बोलणे सुरू होते. यावेळी सदर कर्मचारी म्हणाला, माजी मंत्री हे माझे नातेवाईक आहेत. माझे काहीही होत नाही.कंत्राटी कर्मचारी जोगदंडचे हे बोलणे त्याच्या अंगलट आले. कार्यकर्त्याचा राग अनावर झाला. त्यावेळी वादावादी झाली. बाजूला असलेल्या एका कार्यकर्त्याने कर्मचाऱ्यांच्या श्रीमुखात भडकावली. त्याचे चुकल्यामुळे तक्रार तर सोडा, त्याने या प्रकरणी वाच्यताही केली नाही.सदर कंत्राटी कर्मचाऱ्याच्या अनेक गंभीर तक्रारी आहेत. अर्थपूर्ण व्यवहार शिवाय कामे न करणे, वेळेवर कामे न करणे, गायब राहणे, आलेला नागरिकांना उलट सुलट बोलणे. या प्रकरणी गटविकास अधिकारी संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्यावर काय कारवाई करतात याकडे लक्ष लागले आहे.

## बाळराजे पवार व पप्पू कागदे यांच्या भेटीने बीडच्या शिवछत्र परिवारात उडाली खळबळ !



गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई नगर परिषद निवडणुकीतील भारतीय जनता पार्टीचे पॅनल प्रमुख तथा युवानेते बाळराजे पवार यांनी शुक्रवारी दुपारी बीडला जाऊन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांची त्यांच्या कार्यालयात जाऊन भेट घेतल्याने बीडच्या शिवछत्र परिवारात खळबळ उडाली आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून बीड नगर परिषदेच्या अध्यक्षपदासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या इच्छेनुसार उमेदवारी देण्याचे निश्चित झाले होते. निवडणुका जाहीर होताच बीडच्या शिवछत्र परिवाराने पुढाकार घेऊन पप्पू कागदे यांना उमेदवारीसाठी तयार केले होते. परंतु ऐनवेळी त्यांना उमेदवारी नाकारण्यात आली. त्यामुळे विश्वासघात झाल्याने संतप्त झालेल्या पप्पू कागदे यांनी आंबेडकरी चळवळीतील सर्व प्रमुख संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत भरगच्च पत्रकार परिषद घेऊन शिवछत्र परिवारावर तोफ डागली. नगरपरिषदेच्या निवडणुकीत अजित दादा पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसला एकही मत न देता त्यांच्या सर्व उमेदवारांना पराभूत करण्याचे आवाहन करून बीडच्या पंडितांची राजेशाही वेशीच्या बाहेर फेकून देऊ, असा खणखणीत इशारा त्यांनी दिला. त्यानंतर गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी झालेल्या चुकीबद्दल प्रसार माध्यमासमोर येऊन पप्पू कागदे यांची जाहीर माफीही मागितली. पप्पू कागदे व शिवछत्र परिवारातील वाद अजून शमलेला नसतानाच गेवराई नगर परिषद निवडणुकीतील भारतीय जनता पार्टीचे पॅनल प्रमुख तथा युवानेते बाळराजे पवार यांनी शुक्रवार, दिनांक २१ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी बीडला जाऊन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांची त्यांच्या कार्यालयात जाऊन भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत प्रभाग क्रमांक ६ मधील भाजपाचे उमेदवार महेश सौंदरमल, प्रभाग क्रमांक ७ मधील उमेदवार सुमित्रा नाना थोरात, प्रभाग क्रमांक ८ मधील उमेदवार सोनाली सुतार यांचे वडील, ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते. बाळराजे पवार व पप्पू कागदे यांची बंद खोलीत तब्बल एक तास चर्चा झाल्याचे समजते. चर्चेचा तपशील मात्र समजू शकला नाही. या भेटीमुळे बीडच्या शिवछत्र परिवारात खळबळ उडाली असून पप्पू कागदे यांच्या नाराजीचा बीड जिल्ह्यासह गेवराई नगर परिषदेच्या निवडणुकीत अजित दादा पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसला फटका बसणार यावर या भेटीने शिक्कामोर्तब केल्याचे बोलले जात आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

# बीड शहराचा थंडावलेला विकास गतीने करण्यासाठी नगर परिषद अजितदादांच्या ताब्यात द्या-आ.सना मलिक

## मोमीनपुरा येथील कॉर्नर सभेला आले सभेचे अभूतपूर्व रूप

बीड ।प्रतिनिधी

बीड शहराचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत, सत्ताधाऱ्यांनी नगर परिषदेचा उपयोग स्वार्थासाठी केला. बीड शहराला स्मार्ट करण्यासाठी आणि बारामती शहरासारखा विकास करायचा असेल तर बीड नगर परिषद जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या ताब्यात द्या. बीड शहरात विकासाचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. अजितदादा सारखे नेतृत्व या जिल्ह्याला पालकमंत्र्याच्या रुपाने मिळाले आहे. येणाऱ्या काळामध्ये विकास योजनांसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी येणार आहे, त्यासाठी बीड नगर परिषद राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यात द्या. येणाऱ्या दोन तारखेला घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शिवसेना शिंदे गट-शिवसंग्रामच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह यांच्यासह सर्व नगरसेवकांना प्रचंड मताधिक्याने विजयी करा असे प्रतिपादन आ.सना मलिक शेख यांनी केले. बीड नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रभाग क्र.२२, २३ व २४ च्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या कॉर्नर सभेत त्या बोलत होत्या.




बीड नगर परिषद निवडणुकीच्या प्रभाग क्र.२२, २३ व २४ च्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मोमीनपुरा येथे कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना आ.सना मलिक पुढे म्हणाल्या की, बीडकर तुम्ही नशिबवान आहात कारण तुम्हाला ना.अजितदादा पवार यांच्यासारखे नेतृत्व मिळाले आहे, ते तुमच्या जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. माजी आमदार अमरसिंह पंडित व विद्यमान आ.विजयसिंह पंडित यांच्या विकासाची दृष्टी आणि खंबीर साथ तुम्हाला आहे. बीड शहराचा चेहरा-मोहरा बदलायचा असेल तर बीड नगर परिषदेच्या निवडणुकीतील नगराध्यक्षपदाच्या उच्चशिक्षित उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह प्रभाग क्र.२२, २३ व २४ मधील उमेदवार शेख शबाना खय्यूम, शेख निजाम जैनुद्दीन, मोमीन जुबेर, शेख बिस्मील्ला, शेख शिरीन आणि श्रीमती केशरबाई गलधर यांच्यासह सर्व उमेदवारांना घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड मताधिक्याने विजयी करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

याप्रसंगी बोलताना श्रीमती प्रेमलता पारवे म्हणाल्या की, आम्ही येणाऱ्या काळात मोमीनपुरा भागासह बीड शहरातील विविध प्रभागातील विकासाचा अनुशेष भरून काढू, त्यासाठी तुमच्या आशिर्वादाची गरज आहे. आमच्या पदरात मताचे दान करून काम करण्याची संधी द्या असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी माजी नगरसेवक फारुक पटेल, शेख निजाम, पत्रकार भागवत तावरे, शेख मुजीब यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी अख्तर इमान, खाजाबॉस, खाजी गफार, ड.इरफान बागवान, नजीर चाचू, मुन्ना इनामदार, मोमीन खदीर, शाहेद कुरेशी, खाजी आयुब बागवान यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना, शिवसंग्राम यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



गेवराई ।प्रतिनिधी

मी एका सर्वसामान्य कुटूंबात जन्माला आलेलो आहे. माझे वडिल, आजोबा, पंजोबा कोणीही राजकारणात नव्हते. त्यामुळे मला राजकीय वारसा नाही तरीपण माझ्या विरोधात दळभद्री युती करणारे पंडित-पवार घराण्यातील आठ-आठजण दिवसरात्र माझ्या विरोधात प्रचार करतात, मतदारांना धमकावतात हे अतिशय गंभीर आहे. गेवराई तालुक्याचे विकासप्रिय नेते माजी आमदार अमरसिंह पंडित व आ. विजयसिंह पंडित यांचे विकासाचे व्हिजन घेऊन मी मतदारांसमोर जात असल्यामुळे विरोधकांच्या पायाखालची जमीन सरकली आहे. घडीचा गजर होणार आणि गेवराई नगर परिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा फडकणार असा विश्वास माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांनी व्यक्त केला. गेवराई शहरात विविध प्रभागात मतदारांशी संवाद साधताना ते बोलत होते.

## संपादकीय

# वंशाचे दिवे विझताना...

महाराष्ट्रात नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीचा धुरळा उडाला असल्याने उमेदवारांची अडवाअडवी-पळवापळवी, कार्यकर्त्यांच्या हाणामाऱ्या आणि कोट्यवधींच्या रोख रकमेच्या पकडापकडीला नुसता ऊत आला आहे. या गदारोळात आपल्या चिमुकल्यांच्या देहत्यागाकडे किती संवेदनशील मनांचं लक्ष असेल, कुणास ठाऊक? गेला आठवडाभर शाळकरी विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचं सत्र सुरूच आहे. कारणं वेगवेगळी आहेत, ठिकाणं वेगवेगळी आहेत. पण, या कोवळ्या जीवांना जगण्याचा ताण सोसेनासा झाला आहे. ज्यांनी जन्म दिला, त्यांच्या पिढीने हे जग इतकं क्रूर केलं आहे की, या जगात उमलण्यासाठी त्यांचं मन धजावेनासं झालं आहे. अनावश्यक ताणतणावांचं ओझं घेऊन जगण्यापेक्षा या जगातून स्वतःहूनच गेलेलं बरं, या जाणिवेने हे चिमुकले मोठ्या धैर्याने आपलं जीवन संपवत आहेत. कोणी मेट्रोखाली जीव दिला आहे, तर कोणी गळफास घेतला आहे; कोणी शाळेच्या इमारतीवरून उडी मारली आहे, तर कुणाला शाळेने दिलेली शारीरिक शिक्षा इतकी असह्य झाली की, त्यातच तिचं प्राणोत्क्रमण झालं आहे. ही सगळी उदाहरणं महाराष्ट्र किंवा महाराष्ट्राशी संबंधित आहेत. पण, इथे महाराष्ट्राचा अपवाद नाही. हे देशभर घडतं आहे. पण, त्याकडे 'राष्ट्रीय समस्या' म्हणून पाहावं, कारणांच्या खोलात जावं, असं कुणालाही वाटलेलं दिसत नाही. तशा बातम्या ना वाचायला मिळाल्या, ना प्रसिद्ध करायला मिळाल्या! जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार भारतात २०१७ मध्ये आत्महत्यांचं प्रमाण एक लाख लोकसंख्येमागे ९.९ होतं. ते आता १२.४ पर्यंत पोहोचलं आहे. दुर्दैवाची बाब अशी की, या वाढीला विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचंच प्रमाण कारणीभूत आहे. भारतात गेल्या वर्षात तब्बल १४ हजार विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या अहवालातील आकडेवारी पाहिली, तर २०२३ मध्ये देशात १३ हजार ८९२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचं दिसतं. २०१९ च्या तुलनेत २०२३ मध्ये ही वाढ ३४ टक्के आहे. गेल्या दशकात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांत ६५ टक्क्यांची भयानक वाढ आहे! विद्यार्थ्यांच्या आत्महत्या म्हटलं की, दोषदिग्दर्शनाची सुरुवात नेहमी शिक्षण आणि परीक्षांपासूनच सुरू होते.

# बीड नगर परिषद निवडणूक संदर्भात आज मंत्री पंकजाताईंच्या उपस्थितीत बैठक, मोठ्या संखेने उपस्थित रहा - अशोक लोढा

बीड ।प्रतिनिधी

बीड नगर परिषद निवडणुक २०२५ च्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री मा. ना. पंकजा ताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये भारतीय जनता पार्टीचे अधिकृत नगराध्यक्ष व ५२ नगरसेवक पदाचे उमेदवार आणि पक्षाचे सर्व पदाधिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख व कार्यकर्ते यांची महत्वपूर्न बैठक आज सकाळी ११.०० वा. लोकसेवा मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस भारतीय जनता पार्टीच्या लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे या प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत

या बीड नगर परिषद निवडणुक - २०२५ बहुमताने, सर्व ताकतीने भाजपची सत्ता कशी येईल याबाबत सविस्तर मार्गदर्शन होणार आहे. कार्यकर्त्यांचा उत्साह व मनोबल वाढवण्यासाठी ताई स्वतःच्या व्यस्त कार्यक्रमातून बीडच्या पदाधिकाऱ्यांसाठी येत आहेत.

याबैठकीस बीड भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, भाजप नेते डॉ योगेश भैय्या क्षीरसागर, राज्य परिषद सदस्य सर्जेराव तांदळे, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ आन्ना शिराळे, अल्पसंख्याक महामंत्री सलीम भाई जहांगीर, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष इरशाद भाई, जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे, मा. जिल्हा परिषद अध्यक्ष मीराताई गांधले, जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष संजय आंधळे, ॲड. संगीता धसे, विजेंद्र चौधरी, प्रीत कुकडेजा, मधुकर धांडे, प्रकाश आनेराव, अशोक घोडके, रामदास बडे, जिल्हा उपाध्यक्ष सुंदर चव्हाण, तालुकाध्यक्ष मनोज काका पाटील, राणा दादा डोईफोडे, आशोकजी रसाळ यांच्यासह सर्व जिल्हा कार्यकारिणीतील सदस्य उपस्थित राहणार आहेत.

या बैठकीस सर्व भाजप पदाधिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख व कार्यकर्ते



आणि भाजप प्रेमी मंडळी यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन भाजप शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी या प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# टीईटी विरोधातील मोर्चात शिक्षक संघ ताकदीने उतरणार - भगवान पवार

बीड ।प्रतिनिधी

टीईटी विरोधात ५ डिसेंबरला राज्यभरात शिक्षक व शिक्षकेत्तर संघटना समन्वय समितीतर्फे महामोर्चा आयोजित केला आहे. या मोर्चात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ ताकदीने सहभागी होणार आहे अशी माहिती बीडजिल्हाध्यक्ष भगवान पवार यांनी दिली आहे. सर्व शिक्षकांना टीईटी परीक्षा अनिवार्य केल्यामुळे देशभरातील व राज्यातील लाखो शिक्षकांच्या नोकरीवर संकट निर्माण झाले आहे. या संकटातून मार्ग काढण्या ऐवजी राज्य सरकारकडून जबाबदारी झटकण्याचा प्रकार पहायला मिळत आहे. देशातील उत्तरप्रदेश, उत्तराखंड, तामिळनाडू, आंध्रप्रदेश इत्यादी सरकारांनी टीईटी सक्ती निर्णया विरोधात कायदेशीर पावले उचलली असताना एकट्या महाराष्ट्र सरकारलाच पुनर्विचार याचीका दाखल करण्यासाठी कशी काय कायदेशीर आडचण आहे असा सवाल आहे. सरकारने टीईटी निर्णय विरोधात ठोस भूमिका घ्यावी यासाठी राज्यभरातील शिक्षक ५ डिसेंबर रोजी शाळा बंद ठेवून मोर्चा काढणार आहेत. याबाबत शिक्षक संघाच नेते संभाजीराव थोरात व राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा बीड पूर्ण ताकदीने मोर्चामध्ये सहभागी



होणार आहे. बीड जिल्हयातील सर्व शिक्षक बंधू भिगिनी यांनी मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष भगवान पवार यांच्यासह शिक्षक संघाच्या सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

# ३० नोव्हेंबरच्या नवोदय महासराव परीक्षेत विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे - नाथा ढगे

किल्ले धारूर : (इरशाद मोमीन )

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकाच दिवशी महाराष्ट्रातील नवोदय तज्ञ शिक्षक, व्हिजन ग्रुप ऑफ एज्युकेशन यांच्यावतीने नवोदय महासराव परीक्षा ३० नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेमध्ये सर्व ५ वी नवोदयच्या विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन नवोदयतज्ञ आदर्श शिक्षक नाथा ढगे यांनी शिक्षक पालक व विद्यार्थी यांना केले आहे. ही परीक्षा फायनल नवोदयच्या परीक्षेची रंगीत तालीम समजले जाते . यात काठीण्यपातळी असलेले प्रश्न असतात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी इयत्ता पाचवी नवोदयचा विद्यार्थ्यांची परीक्षेची चांगली



तयारी व्हावी त्यांच्या फायनल परीक्षेतील चुका दुरुस्त व्हाव्यात त्यांच्यावरती परीक्षेचे दडपण येऊ नये यासाठी व्हिजन ग्रुप ऑफ एज्युकेशन संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकाच दिवशी महासराव परीक्षा आयोजित करते याही वर्षीची महासराव परीक्षा दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे .या परीक्षेचे परीक्षा केंद्र धारूर येथे आहे या परीक्षेमध्ये सहभागी होऊन आपल्या विद्यार्थ्यांची नवोदयची तयारी परिपूर्ण करावी असे आवाहन नवोदय तज्ञ आदर्श शिक्षक नाथा ढगे यांनी सर्व विद्यार्थी पालक व शिक्षक यांना केले आहे. ही परीक्षा नवोदयच्या नियमानुसार घेतली जाते नवोदय प्रमाणेच उत्तर पत्रिका प्रश्नपत्रिका व वेळेचे नियोजन केलेले असते यामुळे इयत्ता पाचवीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचा सराव यातून परिपूर्ण होणार आहे तरी सर्व विद्यार्थ्यांनी या परीक्षेत . सहभागी होण्यासाठी संपर्क नाथा ढगे ९८६०९४१७८०, ९८६०२६४५२५. या क्रमांकावर संपर्क करून आपली नाव नोंदणी करावी.

# नगरसेवकपदाच्या उमेदवार पठाण जलील खान आणि गाजी तमकीन मोमीन यांनी घेतली प्रचारात आघाडी



### प्रभाग क्रमांक ०६ मध्ये तुतारीचा बोलबाला

बीड /प्रतिनिधी : आगामी नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वॉर्ड क्रमांक ६ मध्ये नगरसेवक पदाचे उमेदवार पठाण जलील खान आणि गाजी तमकीन मोमीन यांच्या प्रचार मोहिमेला गेल्या काही दिवसांत लक्षणीय गती प्राप्त झाली आहे. स्थानिक पातळीवर त्यांच्या पायदळ मोहिमा व घरदार संपर्क उपक्रमांची जोरदार चर्चा सुरू असून नागरिकांकडून अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

अलीकडील अनेक प्रचार उपक्रमांमध्ये महिलांपासून तरुणांपर्यंत तसेच विविध सामाजिक घटकांनी स्वयंस्फूर्त सहभाग नोंदविला. दोन्ही उमेदवारांनी वॉर्डमधील विविध वसाहतींना भेट देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. नगरपरिषद प्रशासनाचे कामकाज, स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा, मूलभूत सुविधा या मुद्द्यांवर त्यांनी नागरिकांशी संवाद साधत सुधारणा घडवून आणण्याचे आपले धोरण स्पष्ट केले.

निरीक्षकांच्या मते, पठाण जलील खान आणि गाजी तमकीन मोमीन यांचा प्रचार विरोधकांच्या तुलनेत अधिक नियोजनबद्ध आणि व्यापक पद्धतीने राबविला जात आहे. दररोज वेगवेगळ्या भागांमध्ये आयोजित संवाद बैठकीमुळे त्यांचा थेट जनसंपर्क वाढत असून यामुळे विरोधकांमध्ये काही प्रमाणात चिंतेचे वातावरण निर्माण झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# लंपी स्कीनने हिंगणी (खुर्द) येथील धनराज चौरे यांच्या बैलाचा मृत्यू

प्रतिनिधी @ बीड

बीड तालुक्यातील हिंगणी खुर्द येथील चौरे वस्तीवर शेतकरी धनराज तुळशीराम चौरे यांच्या एका बैलाचा लंपी स्कीन च्या आजाराने मृत्यू झाला आहे. मृत्यू झालेल्या सदरील बैलावर पंधरा दिवसापासून उपचार सुरू होते. अगोदरच अतिवृष्टीच्या संकटात असलेल्या शेतकऱ्यावर लंपी स्कीनच्या आजाराणे आता दुहेरी संकट कोसळले आहे.

तसेच सदरील बैलाचा मृत्यू हा रब्बीच्या ऐन पेरणीच्या वेळेला मृत्यू झाल्याने धनराज चौरे या शेतकऱ्यावर आता मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. तरी सरकारने पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून तात्काळ सदरील बैलाचा मृत्यू झाल्याने शेतकऱ्याला पशुसंवर्धन



विभागाच्या नियमानुसार सरकारने आर्थिक मदत करावी. अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

सदरील बैलाचा मृत्यू झाल्यानंतर धनराज चौरे या शेतकऱ्याने भाऊ रमेश चौरे या दोघांनी चौसाळा येथील पशुसंवर्धन विभागाच्या वैद्यकीय अधिकारी यांना सदरील घटनेची माहिती दिली परंतु त्यांना त्यांच्याकडून असे सांगण्यात आले की, सध्या सदरील रोगावर लस उपलब्ध झाल्यामुळे सरकारकडून लंपीच्या रोगामुळे मृत्यू होणाऱ्या जनावरासाठी देण्यात येणारी आर्थिक मदत सरकारकडून बंद करण्यात आलेली आहे.

बैलाला लंबी या रोगाची लागण झाल्यापासून ते त्याचा मृत्यू होईपर्यंत मी त्याच्या उपचारासाठी दहा ते बारा हजार रुपये खर्च केला आहे. परंतु तरीही बैल वाचला नाही तसेच बैलाचा ऐन पेरणीच्या मृत्यू झाला आहे. यावर्षी झालेल्या अतिवृष्टीने शेतीच्या उत्पन्नातही घाटा आलेला आहे त्यामुळे सरकारने सर्व परिस्थितीचा विचार करून आर्थिक मदत करावी ही विनंती.

-धनराज चौरे (शेतकरी, चौरे वस्ती हिंगणी खुर्द)

# बीड-तळेगाव रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्यासाठी ग्रामस्थांचा रास्ता रोको

## तहसीलदारांनी दिले अतिक्रमण हटवण्याचे आश्वासन, अर्धा तास आंदोलन

प्रतिनिधी @ बीड

बीड- तळेगाव शीव रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्यात यावे, असे आदेश तत्कालीन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिलेले आहेत. त्या रस्त्यावरील अतिक्रमण तत्काळ हटवण्यात यावे, या मागणीसाठी गुरुवारी तळेगाव रोडवर ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केले. या प्रकरणी प्रशासनाला निवेदन दिलेले आहे.



बीड-तळेगाव शिव रस्त्यावर अतिक्रमण करण्यात आलेले आहे. हे अतिक्रमण हटवावे, यासाठी ग्रामस्थांनी यापूर्वी उपोषण केलेले आहे. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करावी, असे आदेश यापूर्वी दिलेले आहेत. मात्र अद्याप रस्त्यावरील अतिक्रमण हटवून ३० फुटांचा रस्ता केला नसल्याने ग्रामस्थांनी गुरुवारी तळेगाव येथे रस्ता रोको केला.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामबाग नवीन इमारतच्या पटांगणातून एलईडी लाइट लंपास

वडवणी (प्रतिनिधी)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामबाग वडवणी नवीन इमारत येथे पटांगणात लावण्यात आलेल्या एलईडी लाइटची खांबावरून एक चोरीला गेलाला आढळून आला आहे. प्रशासनाने शहराच्या विविध भागात लख्ख उजेड देणारे एलईडी पथदिवे लावले आहेत. बाजारभावानुसार एलईडी लाइट महाग असल्याचे ध्यानात घेता चोरट्यांनी त्यांची नजर आता सदर लाइटकडे वळविल्याचे दिसून येते. लावण्यात आलेल्या खांबावरून एक चक्क एलईडी लाइटची चोरी झाल्याचा प्रकार प्रभाग क्रमांक-१६ नगरसेवक नागेश भाऊ डिगे हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामबाग वडवणी नवीन इमारत कडे जाण्यासाठी राम मंदिर ते



बाहेगव्हण बायपास रोड ढोले यांच्या शेता पर्यंत सिमेंट नाळी चे काम चालू पाहाणी साठी गेले असता त्यांना निदर्शनास आले की खांबांवरील एल ईडी लाइट चोरी गेलेली आहे. नगरसेवक नागेश भाऊ डिगे यांनी आमचे दैनिक समर्थ राजयोग चे वडवणी तालुका प्रतिनिधी शंकर झाडे यांच्याशी संपर्क करुन यांची माहिती दिली आहे. लख्ख उजेड देणाऱ्या लाइटची किंमत बाजारभावानुसार जास्त असल्यामुळे आता चोरट्यांनी या लाइटवरच हात साफ केल्याचा प्रकार उजेडात आला आहे. खांबावर चढून लाइटची चोरी करण्याचे धाडस करणारे तरुणांना माध्यमातून विनंती करण्यात येते की हे शाळा चे काम आहे.येथे आपले पिढी मुलं,मुली शिक्षण घेऊन आपलं भविष्य उज्ज्वल करणार आहेत.या नवीन इमारतीत चांगल्या दर्जाचे शिक्षण आपल्या विद्यार्थ्यांना मिळणार आहे.करिता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामबाग वडवणी नवीन इमारतीचे चे नुकसान, तोडफोड, साहित्य ची चोरी करु नका.चोरी करणार्या विरोधात आन्याथा गुन्हा दाखल केला जाईल.असा इशारा नगरसेवक नागेश भाऊ डिगे यांनी दिला आहे.

# शेतकरी व जनतेला तात्काळ न्याय द्यावा,नसता तीव्र आंदोलन

## शे.का.प.,शिवसेना,काँग्रेस,वंचित बहुजन आघाडी

पाटोदा (प्रतिनिधी)

बिबट्याच्या भीतीमुळे शेतकऱ्यांना पूर्ण क्षमतेने दिवसा लाईट द्या., वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करा., नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेत अंतर्गत भरपाई द्या., पाटोदा तालुक्यातील गायरान जमिनीवरील पोटखराब काढण्यात यावे., शेतकऱ्यांचे ३ हेक्टर पर्यंत जाहीर केलेले अनुदान तात्काळ देण्यात यावे., खरीप २०२५ मध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुसकान झाले त्यांची विमा भरपाई तात्काळ द्या., अतिवृष्टीत वाहून गेलेले किंवा मयत झालेले पशुधन यांचे नुकसान भरपाई तात्काळ द्या. आशा विषयाचे लेखी निवेदन तहसील कार्यालय पाटोदा



यांना देण्यात आले आहे.

मा.तहसिलदार साहेबांनी वरील विषयाची गंभीर दखल घेऊन शेतकरी व जनतेला तात्काळ न्याय द्यावा नसता तीव्र आंदोलन करण्यात येईल. असे लेखी निवेदनाद्वारे शेकापचे भाई विष्णुपंत घोलप, उध्दव ठाकरे शिवसेनेचे मुकुंद शिंदे, काँग्रेसचे राहुल जाधव, वंचित बहुजन आघाडीचे बाळासाहेब गायकवाड व शिवसेनेचे आकाश कांकरिया वंचितचे राहुल शिरोळे यांच्या सह इतरांनी केले आहे.

# मालेगाव येथे माणुसकीला काळीमा फासणारी घटनेतील आरोपीवर कडक कारवाई करावी – दत्ताभाऊ बोडखे

आष्टी (प्रतिनिधी)

मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावातील कु. यज्ञा दुसाने या चार वर्षाच्या चिमुकलीवर अमानुषपणे अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ आष्टी तालुका सराफ असोसिएशन, आष्टी तालुका व्यापारी असोसिएशन यांच्या वतीने कडकडीत बंद ठेवण्यात आला. त्यासोबतच आरोपीला तात्काळ कठोर शासन करून फाशी द्यावी. या मागणीसाठी तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी शेकडो आष्टीकर उपस्थित होते. मालेगाव येथे माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली. यात डोंगराळे गावातील यज्ञा दुसाने या चार वर्षाच्या चिमुकलीवर एका नराधमाने पाशवी अत्याचार करून अत्यंत अमानुषपणे तोंडावर दगड घालून निर्दयीपणे हत्या केली. एका चिमुकलीसोबत असे नीच कृत्य करणाऱ्या राक्षसी मनोवृत्तीच्या व माणुसकीला काळीमा फासणाऱ्या नराधमाला तात्काळ कठोर शासन करून फाशी द्यावी किंवा त्याचा एन्काऊंटर करावा अशी मागणी आष्टी तालुका महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने करण्यात आली.

या दुर्दैवी घटनेचा निषेध करून दि. २१ नोव्हेंबर रोजी तहसीलदारांना निवेदन दिले. तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात, अत्याचाराच्या घटनेच्या तपासात कुठलीही त्रुटी न ठेवता योग्यपद्धतीने आणि जलद गतीने तपासून आरोपपत्र त्वरित न्यायालयात दाखल व्हावे. हा खटला जलदगती विशेष न्यायालयात चालवावा. मुख्य गुन्हेगार व त्यास सहकार्य करणाऱ्याला देखील सहआरोपी म्हणून गुन्हा दाखल करून कारवाई करावी. अत्याचार झालेल्या चिमुरडीच्या कुटुंबाला शासनातर्फे पोलीस संरक्षण आणि आर्थिक सहाय्य देण्यात यावे. कोणत्याही महिलावरील अत्याचार प्रकरणी प्रशासनाने अधिक गंभीरपणे दखल घेत



कडक कारवाईचे धोरण अमलात आणावे म्हणजे गुन्हेगारांवर वचक बसेल अशी मागणी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे तालुकाध्यक्ष दत्ताभाऊ बोडखे यांनी केली आहे.

# मंगलबाई देशपांडे यांचे निधन

अंबाजोगाई( प्रतिनिधी)

येथील ज्येष्ठ नागरिक सौ.मंगलबाई दिगंबर देशपांडे यांचे प्रदीर्घ आजाराने गुरूवार दि. २० नोव्हेंबर रोजी रात्री निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७८त्यांच्या पश्चात एक विवाहित मुलगा, एक विवाहित मुलगी, सुना,नातवंडे,पतवंड असा परिवार आहे.मुकूंदराज समाधी रस्त्या लगतच्या नृसिंह तीर्थ स्मशानभूमीत



त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार २१ नोव्हेंबर रोजी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. विमा प्रतिनिधी गिरीष दिगंबर देशपांडे यांच्या त्या मातोश्री होत्या.

# जनतेच्या हितासाठी काम करणाऱ्यांनाच संधी - जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे



शिवसेना (शिंदे गट) इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींना उत्स्फूर्त प्रतिसाद

मंठा ।प्रतिनिधी

ग्रामीण भागातील प्रश्नांची जाण असणाऱ्या आणि जनतेच्या हितासाठी काम करणाऱ्या उमेदवारालाच संधी दिली जाईल, असे शिवसेना जिल्हाप्रमुख व सभापती ए. जे. बोराडे यांनी सांगितले. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मंठा तालुका व नेर-सेवली मतदारसंघातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे व तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या उपस्थितीत घेण्यात आल्या. कार्यकर्त्यांनी निवडणुकांसाठी सज्ज राहावे व अधिकृत उमेदवारांची यादी लवकरच जाहीर करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या मुलाखतींना इच्छुक उमेदवारांसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. यावेळी माजी सभापती प्रल्हादराव बोराडे, माजी उपसभापती किसनराव मोरे, संचालक संतोष वरकड, महादेव बाहेकर, केशव महाराज सरकटे, परमेश्वर उबाळे, बाबाराव राठोड आदिंची उपस्थिती होती.

## अजित पवारांच्या व्हिजन मधुन गेवराईचा विकास करण्यासाठी

# राष्ट्रवादीच्या उमेदवारांना विजयी करा - आ. सना मलिक शेख

**गेवराई ।प्रतिनिधी**

**उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी फुले - शाहु - आंबेडकरांची विचारधारा सोडली नाही म्हणुनच आम्ही त्यांच्या बरोबर आहोत. अल्पसंख्यांक समाजाच्या संकट काळात सतत ते भक्कमपणे उभे रहात आहेत, अजितदादांकडे विकासाचे व्हिजन आहे. अजित पवारांच्या व्हिजन मधुन गेवराईचा विकास करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवारांना विजयी करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या स्टार प्रचारक आ. सना मलिक शेख यांनी केले. तर संकट काळात मदतीला धावणार्या हक्काच्या माणसाला निवडुण देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले.गेवराई येथे अल्पसंख्यांक समाजाच्या मेळाव्यात ते बोलत होते. मेळाव्याला महिलांची उपस्थिती लक्षणिय होती.**



## आपल्या हक्काच्या माणसाला निवडुण द्या - अमरसिंह पंडित गेवराईत अल्पसंख्यांक मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

गेवराई नगर परिषद निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई महेश दाभाडे यांच्यासह प्रभागातील सर्व उमेदवारांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादीच्या स्टार प्रचारक आ. सना मलिक शेख, आ. विजयसिंह पंडित आणि माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत अल्पसंख्यांक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, मेळाव्याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष मुस्लिम आणि अल्पसंख्यांक समाजाला न्याय देवु शकतो, त्यासाठी सर्वांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला बळ देण्याची गरज असल्याचे जेष्ठनेते एस.वाय. अन्सारी यांनी आपल्या प्रास्तविक भाषणात सांगुन नगर परिषदेत परिवर्तन करण्याचे आवाहन केले.

यावेळी व्यासपीठावर नविद उज्जमा, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, माजी सभापती मुजीब पठाण, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई दाभाडे, भाऊसाहेब नाटकर, भवानी बँकेचे उपाध्यक्ष अब्दुल हन्नान, खालेद कुरेशी, मुक्ताताई आर्दड, उमेदवार सौ. गंगासागर पवार, भास्कर काकडे, विश्वजित शिंदे, संध्याताई येवले, विलास गुंजाळ, नजमा बेगम निजाम शेख, संगिताताई घोडके, शहारुखपठाण, अशोक गायकवाड, अंजश्रीताई मोटे, वैशालीताई कांडेकर, जाकेरा बेगम इस्माईल शरीफ, पुजाताई सुतार, मनोज धापसे, अंजुताई सुतार, विनोद उर्फ किरण निकम, मंगलताई हजारे, श्रीकृष्ण मुळे, डॉ. रेणुकाताई संभाहरे, शेख खाजा कटुमियॉं, दुरदाना बेगम सलिमोद्दीन फारोकी आणि माधव बेदरे सह मतदार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित हाते. यावेळी महिलांची उपस्थिती लक्षणिय होती.



# दयानंद कला महाविद्यालय येथील शिबिरात सायबर गुन्ह्यांबाबत मार्गदर्शन

लातूर ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या किमान समान कार्यक्रमानुसार सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती करण्यासाठी लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सायबर पोलीस ठाणे व दयानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच दयानंद कला महाविद्यालय येथे जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, पोलीस निरीक्षक श्रीमती बबीता वाकडकर, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी लातूर वकील संघाचे अध्यक्ष ॲड. योगेश डी. जगताप, दयानंद कला महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा. डॉ. अंजली जोशी, पर्यवेक्षक प्रा. डॉ. प्रशांत दीक्षित, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे कर्मचारी व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

श्री. गिरवलकर यांनी यावली माहिती तंत्रज्ञान कायदा २००० बाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. सायबर गुन्हा म्हणजे काय, सायबर गुन्हेगार कोण असतात व ऑनलाईन घोटाळा, ऑनलाईन खंडणी हल्ला, सायबर छळवणूक, सायबर पाठलाग, ऑनलाईन अंमल पदार्थ तस्करी, बौद्धीक मालमत्ता उल्लंघन व ऑनलाईन भरती प्रकीया फसवणूक याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच सायबर गुन्हे टाळण्यासाठी काय दक्षता घ्यावी, याबाबत माहिती देताना श्री. गिरवलकर म्हणाले, संगणक अथवा मोबाईलमध्ये अद्यावत सुरक्षा ॲन्टीव्हायरस प्रणाली असणे गरजेचे आहे, तसेच सायबर गुन्हा घडल्यावर त्याबाबत तत्काळ सायबर पोलिसांना माहिती देणे आवश्यक आहे.

पोलीस निरीक्षक श्रीमती बबीता वाकडकर यांनी विद्यार्थ्यांना पीपीटीद्वारे सायबर गुन्ह्यांबाबत मार्गदर्शन केले. आज सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे, त्यामुळे तरूण पिढीने सायबर गुन्ह्यांबाबत जागरूक असणे गरजेचे आहे. माहिती तंत्रज्ञानाचा वापर करूण वेगवेगळ्या प्रकारचे सायबर गुन्हे समाजात घडत आहेत, आर्थिक नुकसान, लैंगिक छळाच्या सायबर गुन्ह्याचे प्रमाण वाढीस लागत असल्याचे त्यांनी सांगितले. दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. नागरगोजे यांनी विद्यार्थ्यांनी सायबर गुन्ह्यांबाबत सदैव जागरूक राहण्याचे आवाहन केले.

## तर्कशक्तीचा चमत्कार,अध्यात्माचा अविष्कार!

# पाटोद्यातील राजेंद्र 'लोखंडे महाराज' यांना 'समाजरत्न' पुरस्काराने गौरव!

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा तालुक्यातील अध्यात्म, तर्कशास्त्र आणि भाकीतशक्तीचा अद्भुत संगम असलेले व्यक्तिमत्व - राजेंद्र गंगाराम लोखंडे उर्फ लोखंडे महाराज - यांना त्यांच्या विलक्षण कार्य,अद्वितीय तर्कशक्ती आणि समाजातील योगदानाबद्दल 'समाजरत्न पुरस्कार' जाहीर झाला आहे.

दिघोळ (ता.पाटोदा) येथील रहिवासी असलेले लोखंडे महाराज काही वर्षांपूर्वी शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने पाटोद्यात स्थायिक झाले. शालेय जीवनापासूनच अध्यात्मिक प्रवृत्ती असलेले महाराज हे खेमानंद महाराज यांचे शिष्य असून,पुढे ह.भ.प.रामकृष्ण रंधवे




महाराज यांच्या संस्थेत त्यांनी कार्य केले. एम.ए.पर्यंत शिक्षण पूर्ण करूनही त्यांचे लक्ष सदैव अध्यात्म आणि आत्मज्ञानाकडेच केंद्रित राहिले.

ब्रहमचारी जीवन जगणारे लोखंडे महाराज यांच्याकडे एक अद्भुत तर्कशक्ती आहे - समोर आलेल्या व्यक्तीचा चेहरा पाहताच ते त्या व्यक्तीची जन्मतारीख,वार,आणि भविष्यातील घटनांचा वेध अचूकपणे सांगतात.त्यांनी २०२० सालीच भाकीत केले होते की, आ.धनंजय मुंडे आणि लोकनेत्या पंकजाताई मुंडे मार्च २०२४ मध्ये पुन्हा राजकारणात एकत्र येतील, आणि हे भाकीत चपखल खरे ठरले!महाराजांना भूतकाळ आणि भविष्यकाळातील सण,वार आणि तारखा अगदी अचूक सांगण्याची चमत्कारिक किमया अवगत आहे. उदाहरणार्थ - २०४० साली ४ नोव्हेंबरला दिवाळी रविवार असेल,२०५५ साली २४ फेब्रुवारीला महाशिवरात्री बुधवार असेल,१९४७ साली ६ मार्चला होळी बुधवार होती,तर स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट शुक्रवार होता - अशा शेकडो उदाहरणांतून त्यांच्या अद्वितीय ज्ञानाची प्रचिती येते.राज्याच्या राजकारणापासून मानवाच्या आयुष्यापर्यंत - तर्क,श्रद्धा आणि अध्यात्म यांचे अनोखे मिश्रण मांडणारे लोखंडे महाराज हे आजच्या पिढीसाठी आदर्श आणि प्रेरणास्थान

# सिरसाळा येथे सहकारी पतसंस्था संचालक, कर्मचारी यांचा प्रशिक्षण वर्ग संपन्न

बीड/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे चे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर,मा.जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था बीड यांचे विद्यमाने शिरसाळा येथे नागरी, ग्रामीण सहकारी पत संस्थेचे संचालक, कर्मचारी यांच्याकरिता दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला.या कार्यक्रमाचे उद्घाटन राजश्री शाहू नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सिरसाळा चे चेअरमन श्री.वसंत निर्मळ व प्रमाणित लेखा परीक्षक श्री.सी.ए.खोडसे साहेब यांच्या शुभ हस्ते श्री. छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गात सहकार प्रशिक्षण केंद्र लातूरचे उपप्राचार्य एस.आर.कोळे यांनी सहकार कायदा,नियम या विषयावर मार्गदर्शन केले. अभ्यासू मार्गदर्शक तज्ञ श्री.खोडसे सी.ए. प्रमाणित लेखा परीक्षक सहकारी संस्था बीड यांनी



ठेवी सुरक्षितता,कर्ज वितरण करत असताना घ्यावयाची दक्षता, एनपीए,थकबाकी, थकबाकीदारावर १०१ ची कायदेशीर कार्यवाही, ऑडिट संदर्भात व भविष्यात ठेवीदार व संस्था अडचणीत येणार नाही याविषयी सविस्तर मोलाचे मार्गदर्शन केले तसेच श्री.विठ्ठल मुळे प्रमाणित लेखा परीक्षक यांनी संस्था अवसानात येणार नाही याविषयी घ्यावयाची दक्षता याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. समारोप प्रसंगी चेअरमन श्री.वसंत निर्मळ यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.सूत्र संचालन,आभार वर्ग संयोजक श्री.एस.आर. कोळे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वी पार पाडण्यास राजश्री शाहू नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित शिरसाळा कर्मचारी,संचालक

# विद्यार्थ्यांमध्ये श्वान निद्रा व काक दृष्टी असावी - ॲड.उद्धवराव कराड

केज/प्रतिनिधी

दि.२२ नोव्हेंबर २०२५ रोजी साने गुरुजी निवासी विद्यालयामध्ये माध्यमिक विभागाच्या मुलांसाठी सर्जनशील विचार व मूल्य वर्धन यावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज चे संस्था अध्यक्ष अड.श्री. उद्धवरावजी कराड मार्गदर्शन करताना म्हणाले की,विद्यार्थी यांच्याकडे शिक्षण घेत असताना श्वान निद्रा व काक दृष्टी असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.त्याच बरोबर हक्क आणि कर्तव्य याची तुलनाकरून जेवढे आपण हक्कासाठी जागरूक आहोत. तेवढ्याच पद्धतीने कर्तव्याची देखील जाण निर्माण व्हायला पाहिजे. शाळा महाविद्यालयातून आणि पुस्तकांमधून आपणास हक्क तर शिकवली जातात मात्र कर्तव्य अशी स्पष्टपणे कोणी शिकवत नाही. त्यामुळे हळूहळू आपण कर्तव्याकडे दुर्लक्ष करत जातो आणि केवळ हक्का विषयी भांडखोर वृत्ती निर्माण करतो.ज्या पद्धतीने भारतीय




राज्य घटनेने स्वातंत्र्यासारखा भारतीयांना हक्क दिला पण स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे.आपल्याला थोर समाज सुधारक आणि साधुसंतांच्या आचार विचारातून मूल्य आत्मसात करावी लागतात.यासाठी चिकित्सक वृत्ती असावी लागते.ज्यामुळे समाजा मध्ये ज्या चांगल्या वाईट घटना घडतात यांच्यामध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या आपण सहभागी झालो नाही तरी केवळ मूक संमतीने देखील चांगल्या वाईट गोष्टी निमुटपणे सहन केल्याने आपल्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम होतो. व्यक्ती आणि व्यक्तीचे मन हे दोन्ही एकमेकावर अवलंबून असतात स्वामी विवेकानंद असे म्हणतात की,माणसाला जे शारीरिक,मानसिक, सामाजिक घटक दुर्बल बनवणार आहे त्याचा विषयाप्रमाणे त्याग करा. म्हणजे आपल्याला समाजामध्ये एक चांगला माणूस म्हणून जगताना आनंद होईल.आनंद हा स्वतःच्या सुखदुःखावर अवलंबून नसतो किंवा काही वेळा अवलंबून असला तरी तो शाश्वत नाही इतरांच्या सुखदुःखा वर आपलं सुख मानणारा व्यक्ती निर्माण होणे आवश्यक आहे.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी असे म्हटले आहे की, आपण कोणत्याही जाती मध्ये जन्माला आले असाल,कोणत्याही लिंगा मध्ये जन्माला आलेले असाल किंवा शारीरिक व्यंग असाल तरी त्यावर मात करण्याचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण होय आणि म्हणून शिक्षण घेताना आपण सर्जन शीलता वृद्धिंगत केली पाहिजे त्याकरिता आपले मित्र किंवा विचार सतत चांगले असायला हवेत. संत एकनाथ महाराजांनी म्हटल्यानुसार ढेकुनाच्या संगे हिरा ही दुभंगला त्याचप्रमाणे तुम्ही तुमच्या आई वडिलांसाठी,शाळे साठी उद्याच्या भावी भारतासाठी अमूल्य आहात मात्र याला वाईट संगती आणि अविवेकी विचार यांचा सहवास घडल्यास आपण कमकुवत आणि ठिसूळ बनू थोडक्यात आपण मुल्य हीन बनू आणि म्हणून मूल्यशिक्षण व चिकित्सक विचार महत्त्वाचा आहे.यावेळी अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्या डॉ.कविता गीते मॅडम वरिष्ठ सहशिक्षक श्री.मोती सर,जे एन एम कॉलेजचे प्राचार्य नेहरकर सर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कांदे मॅडम यांनी तर आभारप्रदर्शन श्रीमती वडमारे मॅडम यांनी मांडले कार्यक्रम यशस्वी करण्या साठी विभाग प्रमुख दस्तुरे सर यांनी अथक परिश्रम घेतले.

## कामगारांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण व्हावे,सामाजिक सुरक्षा मिळावी

# तसेच कोविड काळातील अन्यायकारक घटनांची दखल घ्यावी, यासाठी हा संघर्ष सुरु आ.सुरेश धस

पाटोदा (प्रतिनिधी)

कोरोना काळात उसतोड कामगारांच्या न्यायहक्कांसाठी लढा उभारणाऱ्या कार्यकर्त्यांवरील दाखल गुन्ह्यांच्या न्यायालयीन प्रक्रियेला आज महत्त्वपूर्ण टप्पा प्राप्त झाला. आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील उसतोड कामगारांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवताना एकूण ४० ते ५० मुकादम आणि कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झाले होते. त्याच प्रकरणातील नियोजित सुनावणीसाठी आ.सुरेश धस संबंधित कार्यकर्ते न्यायालयात हजर राहिले.

कोविड काळात ग्रामीण भागातील हजारो उसतोड कामगार अडकून पडले होते. त्यावेळी त्यांच्या अन्न, निवारा, आरोग्य, प्रवास आणि सुरक्षिततेबाबत गंभीर अडचणी निर्माण झाल्या होत्या. या सर्व प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच तातडीने निर्णय घेण्याच्या मागणीसाठी विविध स्तरांवर आ.सुरेश धस यांच्या माध्यमातून व कार्यकर्ते व आंदोलने, निवेदने आणि मागण्या करण्यात आल्या. याच



आंदोलनांत दाखल झालेल्या गुन्ह्यांचा न्यायालयीन पाठपुरावा सध्या सुरू आहे.

आजच्या न्यायलयान सुनावणीस आ.सुरेश धस उपस्थित राहीले व उपस्थित राहिलेल्या कार्यकर्त्यांनी सांगितले की, कामगारांच्या न्यायासाठी लढताना बसलेले हे गुन्हे आमच्यासाठी सन्मानचिन्ह आहेत. मजदूरांच्या हक्कांसाठी लढा देताना अडथळे आले तरीही न्याय मिळेपर्यंत हा संघर्ष थांबणार नाही.दरम्यान, पुढील तारखेला या प्रकरणाची पुढील सुनावणी होणार असून कामगारांच्या हक्कांसाठी लढा देणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांनी हा मुद्दा न्यायालायतही ठामपणे मांडला आहे. कामगारांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण व्हावे, त्यांना सामाजिक सुरक्षा मिळावी, तसेच कोविड काळातील अन्यायकारक घटनांची दखल घ्यावी, यासाठी हा संघर्ष सुरू असल्याचे आ.सुरेश धस यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणामुळे कोरोना काळातील ग्रामीण कामगारांची दैन्यावस्था, त्यांचा संघर्ष आणि त्यांचे प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. कामगारांवरील अन्यायाला न्याय मिळवून देण्यासाठी सुरू असलेली ही लढाई आगामी काळात आणखी निर्णायक ठरणार आहे आसे आ.धस म्हणेल



# अंबडमध्ये आ.सना ताई मलिक यांची भेट

अंबड ।प्रतिनिधी

शहरात एक महत्त्वपूर्ण राजकीय क्षण पाहायला मिळाला.लोकप्रिय नेत्री आ.सना ताई मलिक यांनी अंबड दौऱ्यादरम्यान युवा नेते असलम करीम शेख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.त्यांच्या आगमनाने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी असलम शेख यांच्या निवासस्थानी शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे विनायकभाई चोथे,अरशदभाई बागवान,वसीमभैय्या तांबोळी, मुद्दसीर शेख आदींची उपस्थिती लक्षणीय ठरली. या सर्वांनी आ. सना ताई मलिक यांचे स्वागत करून विविध स्थानिक प्रश्नांवर संवाद साधला.भेटीदरम्यान अंबड शहरातील विकासकामे, तरुणांच्या संधी आणि आगामी काळातील राजकीय दिशा यावर सखोल चर्चा झाली.आ.सना ताई मलिक यांनी शहरातील युवा शक्तीचे कौतुक करत अंबडच्या प्रगतीत तरुणांचा मोठा वाटा आहे आणि विकासासाठी सर्वांनी एकत्र राहणे आवश्यक आहे असे सांगितल्याचे सूत्रांनी सांगितले.अंबडमधील या भेटीने राजकीय परिसरात नवे संकेत निर्माण केले असून तरुण कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य भरल्याचे दिसून आले.

# यज्ञाला न्याय द्या आरोपीला फाशी द्या अन्यथा जनता कायदा हातात घेणार हिंदू धर्मभूषण श्री नंदकिशोर जी महाराज वायाळ

प्रतिनिधी :- जाफराबाद हरी भालके

तालुक्यातील मोहरा या गावी नुकतेच विघ्नहर्ता डिजिटल प्रिटींग प्रेस चे उद्घाटन सन्माननीय ज्ञानेश्वर माऊली जवखेडकर, हिंदू धर्मभूषण श्री नंदकिशोर जी महाराज वायाळ पाटील यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाले यावेळी गीता जयंती निमित्ताने एकादशी गीता पारायण व भजन आणि भोजनाचे आमंत्रणही वायाळ महाराज यांच्या तर्फे देण्यात आले यावेळी आपले विचार व्यक्त करीत असताना मुलगी म्हणजे लक्ष्मी जन्माला आली जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात कुळी कन्या पुत्र होते जे सात्विक, तयाचा हरिक वाटे देवा हे सगळे खरे आहे पण नुकतेच गेल्या आठवड्यात मालेगाव तालुक्यात डोंगराळे गावात कुमारी यज्ञावरती जो अन्याय झाला तो अत्यंत निंदनीय प्रकार आहे तो मनुष्य असून मानवी रूपात राक्षस आहे त्यामुळे या राक्षसाला त्या देवी स्वरूप असणाऱ्या निष्पाप यज्ञाची दया आली नसावी किंबहुना क्यू आले नाही एवढ्या अल्प वयीन कुमारी मुलीवरती अत्याचार करीत असताना त्याला चुकीचं कसे वाटले नसेल खरंच आता कोणतीच मुलगी, आई, माय, बहिण सुरक्षित नाही ती मेल्यानंतर आता कसला कसला न्याय हो तिला परत मानवी जीवन जगायला भेटेल का परत आई बाबाची माया भेटेल का मंडळी तुम्ही सांगा एकट्या आईने काचेच्या भांडे सारखं कुठपर्यंत त्याला जपायचं माणूस समाज आणि बाकी काही कर्तव्य नाही का तिच्या आईला परत यज्ञा दीदी भेटेल का परत तिची मुलगी घरात अंगणात कधी दिसेल का तर नाही काय चुक होती तिची मुलगी म्हणून जन्माला आली म्हणून सांगा ना फक्त मुलगाच सगळं काही नाही मग नका देऊ मुलीला जन्म नाही येणार आम्ही परत तुमच्या समाजात तळमळ निश्चितच या चिमुरडीने केली असणारच ते फक्त तीन ते चार वर्षाची मुलगी होती आम्ही काही सुरक्षित नाही या देशात जोपर्यंत गाय माय, मुलगी वाचली तरच देशाची प्रगती खऱ्या अर्थाने झा लि असे मी म्हणेन सोबतच कुमारी यज्ञा सोबत नराधमाने हे विकृत कृत्य करून तिला ठेचून मारले त्याप्रमाणे त्याला लवकरात लवकर आता तरी फाशी द्या अन्यथा जनता



हातात कायदा घेतल्याशिवाय राहणार नाही रक्षक असताना जर जनता जनार्दन जीवाला मुकत असेल तर त्याला भक्षक करण्याचा अधिकार जनतेचा आहे जो नेमाचं पालन करतो तो प्रत्येक व्यक्ती या देशातील सामान्य वेश्या मधला पोलिसाचा आहे त्यामुळे जनता हातात कायदा घेऊन त्याला संपविल्याशिवाय राहणार नाही असे स्पष्ट मत गोरक्षण समिती प्रदेश अध्यक्ष हिंदुधर्माभूषण श्री नंदकिशोर जी महाराज वायाळ पाटील यांनी यावेळी व्यक्त केले नसेल फाशी तर डायरेक्ट योगी सरकार प्रमाणे एन काउंटर करून मारा पण मारा च नाही तर यांची विकृत काम करण्याची मनोवृत्ती आणि ताकद वाढत जाऊन सरकारी कामाची कुठलीच भीती देशात राहणार नाही कारण दुसऱ्याचे घर जळणारा गोहत्या, राज हत्या, ब्रह्म हत्या आणि स्त्री हत्या करणारा देशासोबत गद्दारी करणारा याला जिवंत जरी मारले तरी पाप लागत नाही असेही नंदकिशोर जी महाराज वायाळ यावेळी म्हणाले यावेळी शिवसेना शिंदे गट तालुकाप्रमुख सन्माननीय बालाजी पाटील पवार चेअरमन शिवाजीराव पवार बँक मॅनेजर राहुल दादा पवार मा

तंटामुक्ती अध्यक्ष रमेश अण्णा पवार खोले पाटील मा शिवसेना तालुकाप्रमुख बजरंग दादा बोरसे माहोरा पुरुषोत्तम दादा लहाने पत्रकार श्री कृष्णा दादा लहाने ह भ प निवृत्ती महाराज कोरडे कृष्णा महाराज कोल्हे ह भ प प्रल्हाद बाबा कड विजय दादा बदर मा. जिल्हा परिषद अध्यक्ष उत्तमरावजी वानखेडे साहेब दत्तू पाटील अंभोरे तालुकाप्रमुख राष्ट्रवादी अजित दादा गट यासह अनेक मान्यवर मंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते यावेळी कुमारी यज्ञासाठी सामुदायिक मोन ठेवून श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.



मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड - प्रभाग क्र ३ चे उमेदवार सौ. नारनाळीकर लक्ष्मिबाई राजाराम,साबणे बालाजी माणिकराव प्रभाग क्र २ सौ.शालीनीताई संतोष बनसोडे,सुभाष श्रीमंगले सह नगराध्यक्ष पदाचे काँग्रेस उमेदवार सौ.डॉ.दिपाली श्रावण रॅपणवाड यांच्या प्रचारार्थ जि.प.चे माजी अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर यांच्या नेतृत्वाखाली मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे महासचिव डॉ.श्रावण रॅपणवाड,काँग्रेस शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर,दिगांबरराव सोमवारे,अन्वर पठाण,बालाजी वाडेकर,प्रकाश निमलवाड,राजु बनसोडे,शिवाजी गायकवाड,गायकवाड वाय.पी.सर,हणमंतराव श्रीमंगले,संतोष बनसोडे,शिवाजी चैनपुरे, सुनिल पाटील आरगीळे,असदभाई बल्की,नरेश शिंदे,मोहसीन बल्की,सुनिल कांबळे,ईरफान मोमीन,संजय कामजे,शेख मकसुद,शेख रौफ,यांच्यासह पक्षपदाधिकारी प्रभागातील तरुण युवा वर्ग महिला भगीनी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



**बीड ।प्रतिनिधी**

**काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार हर्षवर्धन सपकाळ यांनी दळवी कुटुंबियाची त्यांच्या राजीव गांधी चौक येथील निवासस्थानी सांत्वन पर भेट घेतली. कै. आशोक आप्पा दळवी यांच्या आकस्मिक निधनामुळे जो दुःखाचा डोंगर दळवी कुटुंबियावर कोसळला आहे त्या दुःखात आम्ही सहभागी आहोत अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.त्यांनी अशोक आप्पा दळवी यांच्या स्मृती जागृत करण्यासाठी त्यांच्या विविध सामाजिक शैक्षणिक कार्यात जो सहभाग घेतला आहे तो यापुढे चालू ठेवणे अतिशय महत्त्वाचा आहे असे सांगून दळवी परिवारातील सर्व सदस्यांची आस्थेवाईक पणे विचारपूस केली.या वेळी माजी खासदार तुकाराम रेंगे पाटील,प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख,राहुल सोनवणे कांग्रेस जिल्हा अध्यक्ष ,शेगाव देवस्थानचे रामविजय बुरंगले, दादासाहेब मुंढे ,कैलास रकटे पाटील उपस्थित होते.**

# जी झेड फोटो स्टुडिओचा भव्य शुभारंभ संपन्न...

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी शहरातील राम मंदिर चौकामध्ये झाडे परिवार यांचा जी झेड फोटो स्टुडिओचा भव्य शुभारंभ ह .भ. प. महंत नवनाथ बाबा महाराज गोरक्षनाथ टेकडी घाटसावळी, नवनाथ महाराज चिनके, विठ्ठल महाराज शास्त्री, नगराध्यक्ष शेषेराव जगताप , माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथराव म्हेत्रे, विठ्ठलराव भुजबळ, माजी चेअरमन कचरुशेठ झाडे, नगरसेवक सुधीर भाऊ ढोले,नगरसेवक नागेश डिगे, नगरसेवक हरिदास टकले, युवा उद्योजक गणेश कुरकूटे, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये दिनांक, २१-११-२०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता उदाघाटन सोहळा संपन्न झाला.

वडवणी शहरामध्ये ज्ञानेश्वर तुकाराम झाडे यांच्या जी झेड फोटो



स्टुडिओच्या दुकानचे भव्य उद्घाटन संपन्न झाले. या उद्घाटनाला शहरातील व तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. झाडे परिवाराचे हितचिंतक मित्रमंडळी यांनी ज्ञानेश्वर गोरख झाडे यांना प्रत्यक्ष भेटून भरभरून शुभेच्छा दिल्या. अतिशय कष्टातून मेहनतीने झाडे परिवाराने या दुकानचं उद्घाटन केलेल आहे. शून्यातून निर्माण केलेली ही वास्तू भविष्यात मोठ्या उंचीवर झाडे परिवाराला घेऊन गेल्याशिवाय राहणार नाही. तसेच आलेल्या मान्यवरांचा सन्मान झाडे परिवाराच्या वतीने करण्यात आला. .




**केज/प्रतिनिधी**

**अंबाजोगाई येथील छत्रपती संभाजी राजे ग्लोबल स्कूल आणि ज्यूनिअर कॉलेज आयोजित आंतरशालेय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बनसारोळा ता.केज येथील विद्यार्थी चि.यश नामदेव जोगदंड इयत्ता ५वी याने उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला.या स्पर्धेत सर्व स्पर्धक विद्यार्थी इंग्रजी माध्यमा तील असूनही,मराठी माध्यमातील यशने अत्यंत आत्मविश्वासाने इंग्रजीत आपले सादरीकरण सादर करत परीक्षक आणि प्रेक्षकांची मने जिंकली. प्रभावी उच्चार,स्वच्छ मांडणी व आत्मविश्वास पूर्ण सादरीकरणाच्या जोरावर यशने दुसरा क्रमांक मिळवत शाळेचे नाव उज्ज्वल केले.यश च्या या उत्कृष्ट यशा बद्दल त्याला मार्गदर्शन करणारे इंग्रजी विषय शिक्षक श्री.रोकडे एस. व्ही.तसेच शाळेचे मुख्याध्यापिका श्रीमती चव्हाण मॅडम,संस्थेचे अध्यक्ष अशोकराव काकडे,सचिव बालासाहेब काकडे व सर्व शिक्षकवृंदांनी त्याचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.**

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# भारतीय जनता मजदूर संघाकडून चार श्रम संहितांच्या ऐतिहासिक अंमलबजावणी बाबत भारत सरकारचे स्वागत - श्री शांतप्रकाशजी जाधव

नवी दिल्ली/प्रतिनिधी

भारत सरकारने दि.२१ नोव्हेंबर २०२५ पासून देशभरात चार श्रम संहितांची अंमलबजावणी करण्याचा घेतलेला ऐतिहासिक निर्णयाचे भारतीय जनता मजदूर संघाने (इगचड) उत्साहाने स्वागत केले आहे.भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.शांतप्रकाशजी जाटव यांनी पत्रकारांशी बोलताना सरकारचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

या चार श्रम संहितांमध्ये १.वेतन संहिता २०१९, २.औद्योगिक संबंध संहिता २०२०, ३.सामाजिक सुरक्षा संहिता २०२० आणि ४.व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कार्यपरिस्थिती संहिता २०२० यांचा समावेश आहे. शांत प्रकाश जाटव यांनी सांगितले की,या संहितां मुळे देशातील कोट्यवधी कामगारांच्या जीवन मानात वास्तविक सुधारणा घडणार असून श्रमिक संरक्षण,पारदर्शक वेतनव्यवस्था,सामाजिक सुरक्षा आणि सुरक्षित कामकाजाचे वातावरण निर्माण होणार आहे.



ऐतिहासिक आणि श्रमिक हिताचे पाऊल श्री शांत प्रकाशजी जाटव सरकारच्या निर्णयाचे कौतुक करताना श्री. शांतप्रकाशजी जाटव म्हणाले की,चारही श्रम संहितांच्या अंमल बजावणी नंतर देशाचा संपूर्ण श्रम तंत्र अधिक आधुनिक,सुरक्षित आणि पारदर्शक बनले आहे.गिग वर्कर,प्लॅटफॉर्म वर्कर, महिला,युवक आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांना पहिल्यांदाच वास्तविक सामाजिक सुरक्षा मिळू लागेल.हा निर्णय न्यायपूर्ण श्रम व्यवस्थेच्या दिशेने मोठा टप्पा आहे.

संहितांमुळे होणारे प्रमुख लाभ

देशातील सर्व कामगारां साठी किमान वेतनाची हमी,नियुक्ती पत्र अनिवार्य,पारदर्शकतेला चालना,गिग व प्लॅटफॉर्म वर्करांना प्रथमच सामाजिक सुरक्षा मिळणार आहे,महिलांना सुरक्षिततेसह रात्रीच्या पाळीत कामाची संधी,

सर्व कर्मचाऱ्यांसाठी वार्षिक मोफत आरोग्य तपासणी,देशभरात एडखउ कव्हरेजचा विस्तार, वेळेवर वेतन देणे बंधन कारक असणार आहे, कंत्राटी श्रमिकांनाही समान सुरक्षा,उद्योगां साठी सिंगल रजिस्ट्रेशन आणि सिंगल लायसन्स मुळे सुलभ अनुपालन होणार आहे. भारतीय जनता मजदुर संघाचा जागरूकता अभियानाचा संकल्प

नवीन संहितांची माहिती देशातील प्रत्येक कामगारापर्यंत पोहोंचावी यासाठी भारतीय जनता मजदूर संघ देशव्यापी जन जागृती मोहीम राबवणार आहे असे श्री.शांत प्रकाश जी जाटव यांनी सांगितले. संगठित किंवा असंघटित सर्वच क्षेत्रांतील कामगारांना त्यांच्या नवीन हक्कांची जाणीव करून देणे हा आमचा संकल्प आहे.आत्मनिर्भर भारताच्या दिशेने हे पाऊल महत्त्वाचे आहे असे त्यांनी सांगितले.केंद्र सरकारच्या या निर्णयाचे भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके, महाराष्ट्र राज्य सचिव धनंजय कुलकर्णी, मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील यांनी स्वागत केले आहे.व भारत सरकारचे आभार व्यक्त केले आहेत.

# उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे रमेशराव आडसकर यांच्या हस्ते स्वागत

केज/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार साहेब हे बीड जिल्ह्यात आले असता,केज येथून जात असताना राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जेष्ठ नेते रमेशराव आडसकर यांनी केज येथे भेट घेऊन चालू घडामोडीं व विकासात्मक बाबींची थोडक्यात माहिती देऊन उपस्थित प्रमुख कार्यकर्ते यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. यावेळी अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री.रमेशराव आडसकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुशराजी इंगळे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते दिलीप आबा गुळभिले,राष्ट्रवादी कॉंग्रेस तालुकाध्यक्ष अमर पाटील,युवकतालुकाध्यक्ष शिवदास थळकरी,रंजीत दादा आडसकर तसेच इतर मान्यवर व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.स्थानिक समस्या, विकासकामे व विविध योजनांबाबत थोडक्यात चर्चा करण्यात आली.



केज तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यसरकार सकारात्मक असल्याचे अजितदादा पवार यांनी यावेळी सांगितले.

# जाफराबाद तालुक्यातील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश; पक्षाला नवचैतन्याची भर

जाफराबाद ।हरी भालके

जाफराबाद तालुक्यात आज राजकीय घडामोडींना मोठे वळण मिळाले असून विविध पक्षांतील मान्यवर कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश करून तालुक्यातील राजकीय समीकरणांना नवे वळण दिले आहे. जाफराबाद तालुक्यातील सुप्रसिद्ध पत्रकार शेख अजीम बीजेपी चे कार्यकर्ते समीर पठाण व शेख आयुब, तसेच सामाजिक कार्यकर्ते बाबुभाई आणि उबाठा यांनी आज शिवसेनेत विश्वास व्यक्त करत अधिकृत प्रवेश केला.

हा भव्य प्रवेश सोहळा शिवसेना नेते तथा आमदार अर्जुनभाऊ खोतकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. या



कार्यक्रमाला शिवसेनेचे ज्येष्ठ नेते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमावेळी शिवसेना संपर्कप्रमुख पंडित दादा भुतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, माजी नगराध्यक्ष भास्कर रावजी आंबेकर, दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख मगरे साहेब, शहरप्रमुख विष्णू भाऊ पाचपफुले, जाफराबाद तालुका प्रमुख दत्ता पाटील बंगाळे, शहर प्रमुख फारुख भाई, तसेच किसान सेना तालुकाप्रमुख सुभाष भोपळे आणि उपशहर प्रमुख सलमान पठाण यांची विशेष उपस्थिती होती.नव्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर पक्षाला तालुक्यात नवे बळ मिळणार असून आगामी काळात संघटन अधिक मजबूत होणार असल्याचे नेत्यांनी सांगितले. या प्रवेशामुळे जाफराबाद तालुक्यात शिवसेनेची पकड अधिक घट्ट होण्याची चिन्हे दिसत आहेत.कार्यकर्त्यांनी शिवसेनेच्या भूमिकांवर, खोतकर यांच्या नेतृत्वावर व पक्षाच्या विकासनिष्ठ कार्यपद्धतीवर पूर्ण विश्वास व्यक्त करत सामाजिक व राजकीय कार्य अधिक प्रभावीपणे करण्याची ग्वाही दिली.

शिवसेना जाफराबाद तालुक्याच्या वतीने प्रवेश केलेल्या सर्व मान्यवर कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून, पक्षाने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले आहे.

# निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टच्या इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी विद्यालयाला जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांची भेट

बदनापूर: (प्रतिनिधी) तालुक्यातील वाकुळणी येथील जि.प.प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक जागृती उपक्रमांतर्गत बदनापूर येथील निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टच्या इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी विद्यालयाला भेट दिली. या भेटीचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्रातील विविध घटकांची ओळख करून देणे आहे अशी माहिती शिक्षक डि.व्हि.वड्डे यांनी सांगितले





भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना विविध प्रॅक्टिकल लॅबची माहिती देण्यात आली. औषधनिर्मिती, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र आणि विश्लेषण प्रयोगशाळा येथे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रयोग साहित्य, उपकरणे व प्रक्रियेची माहिती उत्सुकतेने जाणून घेतली. संस्थेचे अध्यक्ष डॉ.देवेशभैय्या पाथ्रीकर यांच्या मार्गदर्शनाखाली फार्मसी विभागाचे प्रा. सौरभ बोद्रे आणि प्रा. क्षितिज वाघ यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक तसेच प्रॅक्टिकल बाबींचे उत्तम स्पष्टीकरण दिले.यावेळी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील जायभाये यांनी विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्रातील करिअरच्या संधी, औषधनिर्मितीचे महत्त्व, आणि दैनंदिन जीवनातील फार्मसीचे योगदान याबाबत मार्गदर्शन केलेया अभ्यास दौऱ्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक पी.बी.राठोड, शिक्षक एल.एम.नरवडे, डि.व्ही.वड्डे, व्हि.एम.निखारे, श्रीमती ए.डी.लाटे श्रीमती एस.सी.सपकाळ यांनी आयोजन केले.

# खा. बजरंग सोनवणे यांच्या हस्ते राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (श.प.) उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ

प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड आणि दीपक (नाना) देशमुख यांची प्रमुख उपस्थिती

परळी ।प्रतिनिधी

परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या उमेदवाराचा प्रचाराचा शुभारंभ राज्याच्या प्रमुख नेत्यांच्या हस्ते होणार आहे. दि. २३ नोव्हेंबर रविवारी रोजी दुपारी ठीक एक वाजता होणार असून राज्याचे प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड, ज्येष्ठ नेते फुलचंद कराड, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गटाचे नेते दीपक रंगनाथ देशमुख, पक्षाचे प्रभारी डॉ. नरेंद्र काळे, ज्येष्ठ नेते प्रभाकर वाघमोडे आणि बाळासाहेब देशमुख, यांच्या प्रमुख उपस्थितीत खासदार बजरंग सोनवणे यांच्या हस्ते होणार आहे.



सर्वप्रथम हनुमान मंदिर मोंढा येथे परळी नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या विकसित परळीचे संकल्प पत्र आणि श्रीफळ फोडून व त्यानंतर आझाद नगर येथील दर्ग्यास चादर अर्पण करून प्रचाराची सुरुवात होणार आहे. या संकल्प पत्रात प्रमुख्याने सुंदर परळी स्वच्छ परळी तसेच दहशतमुक्त आणि महिला सुरक्षा यावर भर देण्यात आला असून, त्या अनुषंगाने प्रचाराच्या शुभारंभ वेळी जाहीर करण्यात येणार आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाचे नेते दीपक रंगनाथ देशमुख व नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ संध्या दीपक देशमुख यांच्या निवासस्थानापासून, गणेश पार येथून या प्रचार रॅली सुरुवात होणार आहे, पुढे ही रॅली राणी लक्ष्मीबाई टॉवर, मोंढा मार्केट, एक मिनार चौका मार्गे, स्टेशन रोड भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन, तसेच, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करून शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहरातील मुख्य कार्यालय येथे समारोप होणार आहे. तरी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व नेते कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने बाबा शिंदे, जेष्ठ नेते उत्तम माने, अड. जिवनराव देशमुख ,शंकर शेजुळ, मुन्ना काळे, सय्यद फिरोज ,वर्षा रायभोळे कल्पना देशमुख, अक्षय सोनवणे, प्रकाश देशमुख आदी शहर व पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याकडून कडुन करण्यात आले आहे.

# बीड नगर परिषदेची एकहाती सत्ता द्या,विकास करुन दाखवतो - आ. विजयसिंह पंडित

## बीडच्या प्रभाग १ व १२ मध्ये आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रचाराचा झंझावात

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार आपल्या बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. अजितदादांनी जसा बारामतीचा विकास केला तसा विकास आपल्या बीड शहराचा करायचा आहे. बीड शहराचे आमदार विरोधी पक्षाचे असले तरी ना.अजितदादांनी पक्षभेद न करता कोट्यावधी रुपयांचा निधी बीडसाठी दिलेला आहे. मी तुमचा आणि ना. अजितदादा यांच्यामधील मध्यस्थ आहे. तुमचे सर्व प्रश्न माझ्या मार्फत मी त्यांच्यापर्यंत नेऊन ते सोडवण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीन त्यासाठी नगर परिषदेची सत्ता आपल्या हातात येणे गरजेचे आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, शिवसेना आणि शिवसंग्राम पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह सर्व नगरसेवक पदाचे उमेदवार बहुमताने विजयी करा असे आवाहन आ.विजयसिंह पंडित यांनी केले. बीड शहरातील प्रभाग क्र.१ व १२ मध्ये मतदारांशी संवाद साधताना ते बोलत होते.

बीड नगर परिषद निवडणुकीतील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, शिवसेना आणि शिवसंग्राम पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह प्रभाग क्र.१ चे उमेदवार सौ.सविता भास्कर



जाधव आणि काळे धनंजय बाळासाहेब तर प्रभाग १२ मधील उमेदवार सौ.मोरे सिता भैय्यासाहेब, सौ.जवकर सारीका सचिन यांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांनी या दोन्ही प्रभागाचा झंझावाती प्रचार दौरा करून मतदारांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, कमी कालावधीत जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांनी कोट्यावधी रुपयांचा निधी बीडसाठी मंजुर करून आणला. अंडरग्राऊंड लाईट, स्टेडीयमसाठी निधी, आयटी पार्क, रखडलेला रेल्वे मार्ग अशा अनेक कामांसाठी निधी उपलब्ध करून दिला. ना.अजितदादा हे बारामतीचे आहेत हे सांगण्याची आवश्यकता नाही. आपल्या बीड शहराला बारामती सारखे सुंदर बनविण्यासाठी आपण सर्वांनी गट-तट मतभेद विसरून राष्ट्रवादी आणि मित्रपक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आणि नगरसेवक पदाचे उमेदवार भरघोस मताने विजयी करून ना.अजितदादांच्या हातात नगर पालिकेची सत्ता द्या, विकास काय असतो हे आम्ही दाखवून देऊ असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, पक्षाचे निरीक्षक माजी आमदार संजय दौंड, सावता परिषदेचे कल्याण आखाडे, बळीराम गवते, निसारभाई, माजी नगरसेवक भास्कर जाधव, कृष्णा वनगुजरे, रमेश चौरे यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, शिवसेना (शिंदेगट) आणि शिवसंग्रामचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मतदारांनी आ.विजयसिंह पंडित यांचे जंगी स्वागत केले. ठिकठिकाणी महिला भगिनींनी त्यांचे औक्षण करून त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. दरम्यान आ. विजयसिंह पंडित यांनी उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह केलेल्या प्रचार दौऱ्यामुळे मतदारांमध्ये उत्साह संचारला आहे.

**जिल्हा कबड्डी निवड चाचणी स्पर्धा उत्साहात,श्री.भाऊसाहेब नाटकर यांच्या हस्ते उदघाटन**

# कबड्डी कुमार गटात शारदा स्पोर्टस तर पुरुष गटात जय हनुमान क्रिडामंडळ सर्व प्रथम

पाटोदा (प्रतिनिधी)

दिनांक :२० नोव्हेबंर :बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन आयोजित कुमार गट/पुरुष (खुला )गटाच्या अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेचे उदघाटन गुरुवार दि.२० नोव्हेबंर रोजी गेवराई येथे आय.टी.आय.मैदानावर सकाळी ठिक १०:००वाजता मा.श्री.भाऊसाहेब नाटकर व मा.श्री.दिपक आतकरे यांच्या शुभहस्ते उदघाटन करण्यात आले.अध्यक्षस्थानी बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन चे कार्यवाह प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते.तर मा.श्री.मधुकर तात्या गर्जे,प्रो.कब्ड्डीचे खेळाडू श्री.महारूद्र गर्जे,व श्री.वैभव गर्जे यांची उपस्थिती होती.या निवड चाचणी स्पर्धेत जिल्ह्यातून १७ संघाने



सहभाग नोंदवला होता.यात कुमार गटातुन सर्वप्रथम शारदा स्पोर्टस, काडमी,गेवराई व सर्व व्दितीय यमाई क्रिडामडळ ,जातेगांव या संघाने यश मिळविले तर पुरुष खुला गटात सर्व प्रथम जय बजरंग क्रिडा मडळ,महासांगवी तर सर्व द्वितीय शारदा स्पोर्टस काडमी,गेवराई .या संघाने यश मिळविले.या स्पर्धेसाठी पंच म्हणुन प्रा.ब्रम्हनाथ मेंगडे,श्री.आर्जुन गर्जे,श्री.नितीन गर्जे,श्री.कृष्णा शिर्के,श्री.शुभम कादे यांनी काम केले.या स्पर्धेचे संचलन प्रा. डॉ.वंदन जाधव यांनी केले.तर आभार प्रा.केशव सुर्वे यांनी मानले.या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा.डॉ.केतन गायकवाड व प्रा.पापाजी चव्हाण,श्री.सिध्देश्वर माने,श्री.श्रीराम इंगळे आदिनी अथक परिश्रम घेतले.या यशस्वी संघाचे बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन चे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री.श्री.शिवाजीरावदादा पंडित,माजी आ.श्री.अमरसिंह पंडित,मा.श्री.जयसिंह पंडित,अध्यक्ष आ.श्री.विजयसिंह पंडित,युवा नेते श्री.पृथ्वीराजे पंडित,युवा नेते श्री.रणवीर काका पंडित यांनी हार्दिक अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# लोकशाहीचा जागर ! महिलांनी रांगोळीतून केली जनजागृती

## रोटरी क्लब व नगरपरिषदेचा उपक्रम

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

आपले मत आपला अधिकार, चला करूया मतदान, असे रांगोळीच्या माध्यमातून विविध संदेश देत महिलांनी अंबाजोगाईत रांगोळ्यांच्या माध्यमातून मतदार जनजागृती केली. येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व नगर परिषद, यांच्या वतीने शुक्रवारी दुपारी नगर परिषदेच्या योगेश्वरी उद्यानात नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जनजागृती साठी रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत ४० महिलांनी आकर्षक रांगोळ्यातून मतदार जनजागृतीचा




संदेश दिला. या रांगोळी स्पर्धेचे परीक्षण जया मुडेगावकर व लक्ष्मण काटे यांनी केले.विजेत्या स्पर्धकांना उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे, तहसीलदार तरंगे,मुख्याधिकारी प्रियंका टोंगे, रोटरीच्या अध्यक्षा प्रा. रोहिणी पाठक, रोटरॅक्ट अध्यक्षा विशाखा बजाज, दिलीप तांबरे व मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

रांगोळ्यांमध्ये मतदान आपले कर्तव्य, राष्ट्रीय हित आपले ध्येय, माझे मत माझे भविष्य अशा प्रभावी संदेशांचे रेखाटन करण्यात आले होते. या संदेशांद्वारे महिलांनी नागरिकांना निर्भीडपणे, जबाबदारीने आणि सजगपणे मतदान करण्याचे आवाहन केले. रांगोळ्या पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी केली होती. या उपक्रमामुळे आगामी निवडणुकीत मतदारांमध्ये आणखी उत्साह निर्माण होईल, अशी अपेक्षा रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा रोहिणी पाठक यांनी व्यक्त केली. यावेळी नगर परिषदेचे अधिकारी,कर्मचारी व रोटरी क्लबचे सदस्य उपस्थित होते.

# गंगाई - बाबाजी रौप्य कला महोत्सवी वर्ष : गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

## कलागुणांना वाव देणारा सर्वोत्कृष्ट कला मोहोत्सव

आष्टी (प्रतिनिधी)

यंदाचे गंगाई - बाबाजी रौप्य महोत्सवी वर्ष आहे. गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन संयोजन समितीने केले आहे. गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कारासाठी प्रस्ताव धार्मिक क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, कृषी क्षेत्र, साहित्य क्षेत्र, पत्रकारिता, शैक्षणिक क्षेत्र, आदर्श तलाठी, आदर्श ग्रामसेवक, आदर्श कलाकार, क्रीडाक्षेत्र, विधी, आदर्श माता - पिता, आदर्श सरपंच, प्राणी मित्र आदी क्षेत्रातील मान्यवरांनी आपले प्रस्ताव दि. २० डिसेंबर २०२५पर्यंत पाठवावेत असे आवाहन गंगाई - बाबाजी रोप्य कला महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

मानवी जीवनामध्ये खऱ्या अर्थाने सर्वांगीण प्रगती आणि संस्कारक्षम जीवन जगण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची आणि सुसंस्कृत आचार विचारांची देवाण घेवाण आवश्यक





आहे. आष्टी तालुक्यातील सर्वोत्कृष्ट संस्कारक्षम उपक्रम म्हणून गंगाई - बाबाजी कला मोहोत्सव याचा उल्लेख करण्यात आहे. गंगाई - बाबाजी कला महोत्सवाची गेल्या २४ वर्षाची परंपरा आहे.

गोरगरीब, दीनदलीत, दुबळ्या, अनाथ, अपंग, शेतकरी, शेतमजूर आणि वंचित घटकांसह ऊसतोड कामगारांच्या मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणून नवी क्रांती करण्याचे काम हा महोत्सव गेली २४ वर्षापासून करत आहे. गोरगरिबांची मुले शिकली पाहिजेत. सुधारली पाहिजेत. संस्कारक्षम झाली पाहिजेत. या उदात्त भावनेने काही वर्षापूर्वी म. फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्यासारख्या राष्ट्रपुरुष आणि समाज सुधारकांनी अतोनात प्रयत्न केले. त्याच शिक्षण क्रांतीच्या ज्योतीवर ज्योत पेटवण्याचे अमूल्य कार्य आष्टीसारख्या ग्रामीण भागामध्ये आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार तथा शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भीमराव धोंडे करत आहेत. यंदाचा हा गंगाई - बाबाजी कला महोत्सव २५ वा आहे. या महोत्सवाचे शानदार उद्घाटन होणार आहे. यावेळी उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्षस्थानी माजी आ. भीमराव धोंडे हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य युवा नेते अजयदादा धोंडे यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कला क्षेत्रातील विविध स्पर्धा गंगाई - बाबाजी कला महोत्सवा अंतर्गत भगवान महाविद्यालयाच्या भव्य मंचावर प्रचंड उत्साहात संपन्न होणार आहेत. या महोत्सवाचे यशस्वीतेसाठी भगवान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, उपप्राचार्य डॉ. आप्पासाहेब टाळके, प्रा. डॉ. ज्ञानदेव वैद्य, सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, कर्मचारी हे परिश्रम घेत आहेत.

# प्रभाग ६ मधून क्रांती गोस्वामी आणि आकाश कराड यांना बहुमताने विजयी करा - राजकिशोर मोदी

**अपक्ष उमेदवारांच्या अपप्रचाराला बळी पडू नका, आघाडीच्या अधिकृत उमेदवारांनाच काम करण्याची संधी द्या**




अंबाजोगाई - अंबाजोगाई नगर पालिका सार्वत्रिक निवडणुकात प्रभाग ६ मधून आकाश कराड आणि क्रांती गोस्वामी हे लोकविकास महाआघाडीचे अधिकृत उमेदवार असून त्यांनाच आपले बहुमुल्य मत देऊन विजयी करावे आणि सेवेची संधी द्यावी असे आवाहन नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी यांनी केले. काही अपक्ष उमेदवार राजकिशोर मोदी यांचे नाव वापरून दिशाभूल करत मते मागत असल्याने मोदी यांनी जाहीरपणे याबाबत खुलासा केला.

निवडणूक जवळ आल्याने शहरात राजकीय घडामोडींना वेग आला असून राजकिशोर मोदी यांच्या लोकविकास महाआघाडीला संपूर्ण अंबाजोगाई शहरातून पाठींबा वाढत आहे. मोदी यांच्यासह आघाडीच्या सर्वच उमेदवारांची बाजू भक्कम होत असून लोकविकास आघाडी सत्तेत येणार हे जवळपास निश्चित आहे. प्रभाग ६ मधून लोकविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आकाश कराड आणि क्रांती गोस्वामी यांनाही मोठा जनाधार मिळतो आहे. आतापर्यंत या दोन्ही उमेदवारांनी संपूर्ण प्रभाग पिंजून काढला असून मतदारातून त्यांच्या उमेदवारीचे स्वागत होत आहे. आकाश कराड यांच्या कुटुंबाचा नगरसेवक म्हणून आधीचा कामकाजाचा अनुभव या निवडणुकीत त्यांना मजबूत पार्श्वभूमी मिळवून देत आहे. क्रांती गोस्वामी या प्रथमच निवडणूक लढवत असल्या तरी त्यांचे पती श्रेयस उर्फ शैलेश गोस्वामी यांचा प्रभागात दांडगा जनसंपर्क असल्याने त्यांच्याही उमेदवारीला बळ मिळत आहे. लोकांच्या अडीअडचणीला धावून जाणारा तरुण अशी त्यांची ओळख प्रभागात आहे. यासोबतच त्यांच्या पाठीशी राजकिशोर मोदी ठामपणे उभे असल्याने या दोन्ही उमेदवारांचे निवडणुकीतील पारडे जड आहे. परंतु, काही अपक्ष उमेदवार या ठिकाणी राजकिशोर मोदी यांचा आम्हाला पाठींबा असल्याचे खोटा प्रचार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी, प्रभागातील मतदारांनी या अपप्रचारला बळी न पडता लोकविकास महाआघाडीचे अधिकृत उमेदवार क्रांती गोस्वामी आणि आकाश कराड यांनाच विजयी करावे

# श्रीमती गंगाबाई साबू यांचे वृद्धापकाळाने निधन



मंठा/ प्रतिनिधी : मंठा येथील गंगाबाई श्रीरामजी साबू यांचे वृद्धापकाळाने शुक्रवार ता. २१ रोजी सायंकाळी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९२ वर्षे होते.त्यांचेवर शनिवार ता. २२ रोजी ११ वाजता येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी साबू परिवाराचे निकटवर्तीय, प्रतिष्ठित व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात गोपालदास, शामसुंदर, राधेश्याम ही तीन मुले, दोन मुली, जावई, सुना, नातवंड, पतवंड असा मोठा परिवार आहे.

# हॉटेल व व्यवसायिकांनी घरगुती गॅसचा गैरवापर थांबवा

## तहसीलदार सुमन मोरे व नायब तहसीलदार विकाससिंग राजपूत यांचा इशारा





डॉ आशिष तिवारी/मंठा

तालुक्यातील काही हॉटेल तसेच व्यावसायिक प्रतिष्ठानांकडून घरगुती गॅस सिलेंडरचा वापर करून स्वयंपाक व व्यावसायिक कामे केली जात असल्याचे प्रकार समोर येत असून, प्रशासनाने याबाबत गंभीर भूमिका घेतली आहे.तहसील कार्यालयाकडून काढलेल्या निवेदनात तहसीलदार सुमन मोरे यांनी स्पष्ट केले की, घरगुती गॅसचा वापर फक्त घरगुती कारणांसाठीच मान्य आहे. व्यावसायिक वापर करणे हा जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अन्वये गुन्हा ठरतो.

नायब तहसीलदार विकाससिंग राजपूत यांनीही इशारा देत म्हटले की, घरगुती गॅसचा गैरवापर आढळल्यास संबंधितांविरुद्ध कलम ३ व ७ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

प्रशासनाचे निर्देश :

१)व्यवसायिकांनी वर्गनिहाय परवान्यानुसार व्यावसायिक गॅस सिलेंडरचाच वापर करावा

२)घरगुती गॅसचा वापर करताना आढळल्यास दंडात्मक व कठोर कारवाई

३)नियमांचे काटेकोर पालन करणे सर्वांसाठी बंधनकारक

प्रशासनाने सर्व व्यावसायिकांना आवाहन केले आहे की, कायद्याचे उल्लंघन टाळावे व परवानाधारक गॅसचाच वापर करावा. अन्यथा कारवाई अपरिहार्य असेल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

# अंबड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५

## प्रभाग क्र. ७ मध्ये भाजपची दमदार कॉर्नर सभा शिवसेना उबाठा गटाचे अल्पसंख्यांक शहराध्यक्ष सगीर बिल्डर यांचा कार्यकर्त्यांसह भाजपात शक्तीशाली प्रवेश



अंबड ।प्रतिनिधी

अंबड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या तयारीत भारतीय जनता पार्टीने प्रभाग क्र. ७ मध्ये घेतलेली कॉर्नर सभा अभूतपूर्व उत्साहात पार पडली. भाजपाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित या सभेला नागरिकांची मोठी गर्दी उसळली होती. उमेदवारांनी व पदाधिकाऱ्यांनी मतदारांशी थेट संवाद साधत कमळ या निशाणीसमोरील बटण दाबा आणि सर्व उमेदवारांना विजयी करा असे जोरदार आवाहन केले.

सभेची मोठी राजकीय ठळक घटना म्हणजे शिवसेना उबाठा गटाचे अंबड शहर अल्पसंख्यांक अध्यक्ष शेख सगीर बिल्डर यांनी कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पार्टीत केलेला प्रवेश. आमदार नारायण कुचे यांच्या नेतृत्वावरील विश्वास आणि विकासाच्या राजकारणाशी नाळ जुळल्याने हा निर्णय घेतल्याचे सगीर बिल्डर यांनी स्पष्ट केले. आमदार नारायण कुचे यांच्या हस्ते त्यांचा भाजपात दिमाखदार प्रवेश करण्यात आला.या प्रवेशामुळे अल्पसंख्यांक मतदारसंघात भाजपची पकड आणखी मजबूत होणार असल्याचे निरीक्षण उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. प्रभाग क्र. ७ मधील या सभेला आमदार नारायण कुचे यांच्यासकट भारतीय जनता पार्टीचे सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रचारसभेच्या आवेशात घोषणांनी वातावरण दणाणून गेले होते. कमळ उमेदवारांना शहरातून भक्कम समर्थन मिळत असल्याचे या कॉर्नर बैठकीतून स्पष्टपणे दिसून आले. अंबडमधील निवडणुकीचे पारडे भाजपकडे झुकत असल्याची चर्चा सभेनंतर राजकीय वर्तुळात रंगली.

# ईमारत असूनही शाळेला जाणारा रस्ता बंद

## महिनाभरापासून झाडाखाली भरते शाळा - डॉ. गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील टाकरवण जिल्हा परिषद केंद्रीय शाळा अंतर्गत दत्तनगर येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे गेल्या महिनाभरापासून झाडाखाली उघड्यावर बसून शिक्षण घ्यावे लागते. शाळेची इमारत असूनही शाळेला जाणारा मार्ग काही नागरिकांनी बंद केल्याने विद्यार्थ्यांना कायमस्वरूपी त्रास सहन करावा लागत आहे.

या गंभीर प्रश्नासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी पालकमंत्री अजितदादा पवार व आमदार विजयसिंह पंडित यांना ईमेलद्वारे निवेदन देत तातडीने रस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली असून, जिल्हा प्रशासनाला आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

६ गुंठे दानजमिनीवर उभारलेली इमारत तरीही रस्ताच नाही




दत्तनगर वस्तीतील ही शाळा १ ते ४ थी पर्यंत चालते. येथे सुमारे ३४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कैलास शिंदे यांनी दानपत्राद्वारे गट क्रमांक २४६ मधील ६ गुंठे जमीन दिल्यानंतर प्रशासनाने शाळेची पक्की इमारत उभारली. याच ठिकाणी अंगणवाडीही चालते.शिक्षकांच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण झाली असतानाच रस्ता अडथळ्यामुळे संपूर्ण शिक्षण प्रक्रियेलाच तडा गेला आहे.

भोवती वाढलेल्या लोकवस्तीचे दुष्परिणाम रस्ता बंद!

शाळेची इमारत उभी राहिल्यानंतर परिसरात मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती वाढली. काही नागरिकांनी त्यांच्या जागेभोवती तारेचे कुंपण उभारून संपूर्ण मार्गच बंद केला. परिणामी विद्यार्थी शाळा डोळ्यासमोर दिसूनही तिथपर्यंत पोहोचू शकत नाहीत.

शिक्षक-पालक त्रस्त,प्रशासनाचे मौन कायम

मुख्याध्यापक गणेश भुंबे यांनी सांगितले की,वारंवार लेखी सूचना देऊनही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नाही. रस्ता दुरुस्तीसंबंधी कोणताही स्पष्ट निर्णय अथवा वेळापत्रक प्रशासनाने आजवर दिलेले नाही.पालक आणि ग्रामस्थांनीही या गंभीर दुर्लक्षाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

शाळेला तातडीने रस्ता उपलब्ध करून द्यावा

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची आणि नियमित शिक्षणाची जबाबदारी प्रशासनाने घ्यावी.दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.उपाय न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल.



# ज्येष्ठ अनुभवी नरसिंग नाईकवाडेंच्या प्रवेशाने राष्ट्रवादी महाविकास आघाडीचे पारडं जड - राजेंद्र मस्के

बीड ।प्रतिनिधी

बीड नगर परिषदेतील ज्येष्ठ व अनुभवी नगर सेवक तथा सभापती नरसिंग अण्णा नाईकवाडे, त्यांचा मुलगा शैलेश नाईकवाडे यांनी मा. शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वावर दृढ विश्वास व्यक्त करत आ. संदीपभैया क्षीरसागर,माजी आमदार सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, वैजनाथ नाना तांदळे, अजय नाईकवाडे तालुका अध्यक्ष बाळासाहेब गोरे, यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करून हाती तुतारी घेतली आहे. पक्षाच्या वतीने स्वागत करण्यात आले असून शैलेश नाईकवाडे यांन युवक उप जिल्हा उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली. नरसिंग नाईकवाडे यांच्या प्रवेशा मुळे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे पारडं जड झाले.नाईकवाडे यांचा प्रदिर्घ अनुभव व जनसंपर्काचा फायदा

तुतारीच्या विजयासाठी निश्चित होईल.असा विश्वास राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केला.गेली ४० वर्षापासून नरसिंग अण्णा नाईकवाडे बीड नगर परिषदेच्या राजकारणात सक्रिय सहभागी असुन सहा वेळा त्यांच्या परिवाराने नगरसेवक व विविध सभापती पदाची जबाबदारी चोखपणे संभाळली आहे.सर्व जाती धर्माच्या लोकांशी थेट संपर्कात असतात. अल्पसंख्याक समाजात ही त्यांची प्रभावी ओळख आहे.



आष्टी - येथील भगवान महाविद्यालय संचलित बाबाजी करिअर अकॅडमीचे संचालक राहुल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तुषार मिसाळ, ओम बांगर, बालाजी जगताप, कृष्णा केरूळकर, कृष्णा मिसाळ, सुनील गवारे, महेश जगताप, अंकुश आगलावे, ऋषी कचरे, बालाजी शेलार, रोहित आंधळे, विशाल शेळके, ज्ञानेश्वर कदम यांच्यासह २३ युवकांची इंडियन आर्मीमध्ये निवड झाली. त्यानिमित्त माजी आ. भीमराव धोंडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार केला.

# पोलीस भरतीसाठी जातप्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्तव इतर प्रमाणपत्रात अडथळे





आष्टी (प्रतिनिधी)

पोलीस भरती प्रक्रियेत जात प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त व इतर प्रमाणपत्राची आवश्यकता भासणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना तहसील कार्यालय तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयात विविध तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने, मराठवाडाभूषण लोकनेते सुरेश धस प्रतिष्ठान तर्फे विद्यार्थ्यांना तातडीचा दिलासा देण्याचा प्रयत्न सुरु करण्यात आला असून आष्टी, पाटोदा, शिरूर कासार मतदारसंघातील मुलांनी या पार्श्वभूमीवर माऊली जरांगे यांनी संबंधित अडचणी आल्यास थेट संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

जात प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त व इतर प्रमाणपत्र मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांकडे प्रकल्पाच्या मूळ संचिका, वारस नोंद सातबाऱ्यावर, ना हरकत प्रमाणपत्र, मृत्यू प्रमाणपत्र तसेच कमी - जास्त पत्रक यांसारखी कागदपत्रे पूर्ण असणे अत्यावश्यक आहे. मात्र, ही कागदपत्रे उपलब्ध नसणे, अथवा कार्यालयीन स्तरावर होणारी दिरंगाई यामुळे अनेक तरुणांना प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत आहे. भूसंपादन अधिकारी तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांकडे प्रमाणपत्र हस्तांतरण किंवा पडताळणी प्रक्रियेदरम्यान अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांना अनावश्यक त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे प्रमाणपत्राची आवश्यकता असणाऱ्या पोलीस भरतीच्या उमेदवारांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

या परिस्थितीवर तोडगा म्हणून मदत कक्ष कार्यरत करण्यात आला. आष्टी तालुक्यात प्रविण पोकळे मो. ९९२१४२७१२७, पाटोदा तालुक्यात माऊली जरांगे मो. ८६९८५३७४७४, शिरूर तालुक्यात गणेश भांडेकर ९८२२७५९७५१ यांना संपर्क करावा. मूळ नोंदी असलेले विद्यार्थी तातडीने संपर्क साधू शकतील, असेही मराठवाडा भूषण लोकनेते आ. सुरेश आण्णा धस प्रतिष्ठानच्या वतीने जि. प. सदस्य माऊली जरांगे यांनी कळविले आहे.

# राज्यातील फार्मसी महाविद्यालयातील ३० टक्के जागा दरवर्षी रिकाम्या



**फार्मसी शिक्षणाचा मागणीपेक्षा पुरवठा अधिक गरजेपेक्षा अधिक महाविद्यालयांची भर**

प्रतिनिधी । मुंबई

गेल्या काही वर्षांत देशभरात फार्मसी महाविद्यालयांची भरमसाठ वाढ झाली आहे. औषध उद्योग हे सदैव तेजीत असणारे क्षेत्र मानले जात असले तरी फार्मसी शिक्षणाच्या बाबतीत गरजेपेक्षा मोठ्या प्रमाणात महाविद्यालयांची संख्या वाढल्याने अनेक महाविद्यालयांच्या जागा रिक्त राहण्याची स्थिती निर्माण झाली आहे. यामुळेच तब्बल सुमारे ३० टक्के जागा दरवर्षी रिकाम्या राहतात, अशी माहिती शिक्षण क्षेत्रातील जाणकारांनी दिली.

फार्मसीमध्ये करियर करण्यासाठी मागणी अद्याप टिकून आहे. औषधांची गरज सदैव राहणारच असल्यामुळे हे क्षेत्र सनशाईन सेक्टर म्हणून ओळखले जाते. कोविड काळातही औषध उद्योगाने मंदीला तोंड दिले नाही; उलट मागणीत वाढ झाली. तरीही फार्मसी शिक्षणात असंतुलन निर्माण होण्याचे प्रमुख कारण म्हणजे महाविद्यालयांची अतिवाढ.

## लाडकी बहीण योजनेत एकल महिलांना दिलासा
# ई-केवायसीसाठी पर्यायी सुविधा; अडचण दूर



प्रतिनिधी । मुंबई

राज्यातील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसी प्रक्रियेमुळे गेल्या काही दिवसांत अनेक महिलांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. योजनेतील पारदर्शकता वाढवण्यासाठी शासनाने ई-केवायसी बंधनकारक केली असली, तरी पती किंवा वडिलांचे आधार कार्ड उपलब्ध होत नसल्याने योजनेतील एकल महिलांच्या अडचणी वाढल्या आहेत. यावर उपाय म्हणून शासनाने एकल महिलांच्या ई-केवायसीसाठी पर्यायी सुविधा उपलब्ध करून अडचण दूर केली आहे.

सरकारच्या नव्या निर्णयानुसार, ज्या महिलांचे पती किंवा वडील हयात नाहीत किंवा त्या घटस्फोटित आहेत, अशांना आधारच्या जागी अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र, घटस्फोट प्रमाणपत्र किंवा न्यायालयाचा आदेश सादर करता येणार आहे. या कागदपत्रांची सत्यप्रत अंगणवाडी सेविकांकडे जमा करावी लागणार असून सेविका त्याची तपासणी करून त्या महिलांना पती-वडील यांच्या ई-केवायसीमधून सूट देण्याची शिफारस पुढे पाठवतील. हा निर्णय योजनेतील पारदर्शकता राखत एकल महिलांचे हक्क अबाधित राहावेत यासाठी घेतला गेल्याचे महिला व बालविकास विभागाने स्पष्ट केले आहे.

ई-केवायसीची अंतिम मुदत ३१ डिसेंबर असल्यामुळे या प्रक्रियेची पूर्तता करण्यासाठी लाभार्थींनी तातडीने आवश्यक कागदपत्रे द्यावीत असे आवाहन करण्यात आले आहे. लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी राज्यभरातील लाखो महिलांनी नोंदणी केली असून त्यांना दर महिन्याला आर्थिक सहाय्य दिले जाते. परंतु नव्या ई-केवायसी नियमांमुळे अनेक महिलांना आधार क्रमांक अनिवार्य करण्यात आल्याने काहींची पेमेंट प्रक्रिया अडथळ्यात आली होती. पती-वडील दोघेही नसलेल्या महिलांना आधार क्रमांक देणे शक्य नसल्याने काही प्रमाणात संभ्रम आणि भीती निर्माण झाली होती. काही महिला गटांनी या नियमाविरोधात आवाज उठवून शासनाकडून पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. शासनाने त्यास सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने विशेष प्रक्रिया लागू केल्याने मोठा दिलासा लाभार्थींना मिळाला आहे.

## वृध्द महिलेवर अत्याचार करण्या-या
# नराधमास जन्मठेपीची शिक्षा
### जिल्हा व सत्र न्यायधीश २ मा. एम. आर शिटे मॅडम यांचा महत्वपूर्ण निकाल

बीड ।प्रतिनिधी

दिनांक. २९.१२.२०२२ रोजी आरोपी याने वृध्द महिलेवर पहाटे ०३.०० वाजणेच्या सुमारास वृध्द महिला झोपलेली असतांना आरोपी याने वृध्द महिलेस हाणमार करून तिच्यावर बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी गेवराई येथील रहिवाशी असलेल्या आरोपीस मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश - २ भा. एस.आर.शिदे मॅडम यांनी आरोपीस दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा व ५,०००/रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास व कलम ३२३ भादवी प्रमाणे १ महिना सश्रम कारावास एवढी शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल ॲड. बी. एस. राख यांनी काम पाहिले.

रोजी पहाटे ०३.०० या प्रकरणी थोडक्यात हकिगत अशी की, दिनांक २९.१२.२०२२२ वाजणेच्या सुमारास पिडीता ही गेवराई यस स्थानकाच्या बाजूला झोपलेली असतांना आरोपीने पिडीतेच्या तोंडावर हात ठेवून तोंड दाबले, मारहाण केली व वृध्द महिलेवर बळजबरीने लैंगिक आयाचार केला. पीडितेस मारहाणीमुळे जखमा झाल्या त्यामुळे तीस उठता आले नाही तिने सकाळी रत्यावरून जाणा-या व्यक्तीस बोलावून तिच्या मुलास फोन करण्यास सांगितले त्यानंतर वृब्द महिलसे औषध उपचार कामी उपजिल्हा रुग्नालय गेवराई येथे शरीक करण्यात आले. त्यानंतर पिडीतीने



फिर्याद दिली.

पिडीतेच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन गेवराई येथे आरोपी विरूध्द कलम ३२४,३७६ (२) (एम) भादवी प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. सदर फिर्यादीवरून तत्कालीन सपोनि श्री. एस.अ.काळे, गेवराई पोलीस स्टेशन यांनी या प्रकरणाचा तपास केला व दोषारोपपत्र प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी गेवराई येथे दाखल करण्यात आले व सदर प्रकरण मा. जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे वर्ग करण्यात आले.

सदर प्रकरणी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश २ मा. एस. आर. शिदे मॅडम यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. सदर आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकूण १२ साक्षीदार तपासण्यात आले व सदर प्रकरणात पिडीता, पंच, वैद्यकीय अधिकारी, तपासी अधिकारी व साक्षीदार यांचा पुरावा व सहा सरकारी वकिल श्री. बी. एस. राख यांचा युक्तीवाद ग्राहय धरूनम आरोपी नामे ज्ञानेश्वर लक्ष्मण मुंबर्डे यास मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश २ मा. एस.आर.शिदे मॅडम यानी आरोपीस दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा व ५,०००/रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास एवढी शिक्षा ठोठावली आहे.सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल श्री बी. एस. राख यांनी काम पाहिले त्यांना जिल्हा सरकारी वकील श्री अजय दि. राख यांनी मार्गदर्शन केले तपास अधिकारी पोनि श्री एस.अ.काळे व पैरवी अधिकारी -ड/५३९ श्री. सुरेश धोंडिराम जाधव, श्रीमती. एस.ए. चव्हाण, महिला पोलीस अंमलदार यांनी सहकार्य केले.

## डोंगराळेतील ३ वर्षांच्या यज्ञावर अमानुष अत्याचार व हत्या, सुवर्णकार समाजात संतापाची लाट दोषींना तात्काळ फाशीची मागणी



लातूर ।प्रतिनिधी

मालेगाव तालुका (जि. नाशिक) येथील मौजे डोंगराळे गावात सुवर्णकार समाजातील केवळ तीन वर्षांच्या चिमुकली कु. यज्ञा जगदीश दुसाने हिच्यावर झालेल्या क्रूर अत्याचारानंतर निर्घृण हत्या झाल्याने संपूर्ण समाजमन सुन्न झाले आहे. या भीषण घटनेनंतर सर्वत्र संतापाची लाट उसळली असून दोषींना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे.या पार्श्वभूमीवर लातूर जिल्हा सोनार समाज असोसिएशन, लातूर यांच्या वतीने मा. जिल्हाधिकारी, लातूर यांना निवेदन देण्यात आले.

संघटनेने आपल्या निवेदनात म्हणटले आहे कीं निष्पाप बालिकेला न्याय मिळावा आणि दोषींना फाशीची शिक्षा व्हावी, हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असे नमूद केले.टसरच या निवेदनत:सदर गुन्हा फास्टट्रॅक न्यायालयात वर्ग करून खटला तातडीने चालवावा.दोषींना फाशीची शिक्षा होण्यासाठी आवश्यक पाठपुरावा संबंधित प्राधिकरणांकडे तातडीने करावा.अशा घृणास्पद घटनांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्या.अश्या मागण्या करण्यात आल्या असून सदर निवेदन लातूर जिल्हा सोनार समाज असोसिएशनचे अध्यक्ष राजाभाऊ हरिभाऊ बोकन यांच्या नेतृवाखाली जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष ओमअप्पा धरणे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष ॲड. गणेश गोमचाळे, तालुका अध्यक्ष राहुल भुतडा, समाजाचे गजेंद्र बोकन, शिवसेनेचे आकाश बजाज, गणेश बेद्रे, पुष्कर उपाध्याय आदी मान्यवर उपस्थित होते.निवेदनाद्वारे समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन या गंभीर प्रकरणात न्याय मिळावा आणि गुन्हेगारांना आदर्श शिक्षा व्हावी, अशी ठाम भूमिका सोनार समाजाने घेतली आहे.

## तुलसी शैक्षणिक समूहाची
# आंतरराष्ट्रीय झेप
### वेलनेस आणि ब्युटी शिक्षणासाठी कोरियन वेलनेस नेटवर्कसोबत ऐतिहासिक करार

बीड ।प्रतिनिधी

मराठवाड्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तुलसी शैक्षणिक समूहाने वेलनेस आणि ब्युटी शिक्षण क्षेत्रात जागतिक सहकार्याची दिशा दाखवणारे महत्त्वपूर्ण पाऊल टाकत दक्षिण कोरियातील कोरियन वेलनेस नेटवर्क सोबत लेटर ऑफ इंटरेस्ट (एलओआय) वर स्वाक्षरी करून जागतिक दर्जाच्या संयुक्त शिक्षण कार्यक्रमांचा मार्ग मोकळा केला आहे.

विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारा हा महत्त्वपूर्ण करार रविवार, दि.१६ रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे संपन्न झाला. या वेळी कोरियन प्रतिनिधी म्हणून कोऑपरेटिव्ह एम्प्लॉयमेंट मूव्हमेंट नॅशनल मुख्यालय, सियोलचे चेअरमन चोई यंग हो, कोरियन बुद्धिस्ट युनिव्हर्सिटीचे व्हाईस चान्सलर आणि प्रख्यात धम्माचार्य डॉ. ली ची रान तसेच वर्डेस्क स्ट्रॅटेजी प्रा.लि., पुणेचे



सल्लागार आयु. नितीन साळवे उपस्थित होते. तुलसी एज्युकेशनल इन्स्टिट्यूटतर्फे प्रा.प्रदीप रोडे यांनी प्रतिनिधित्व केले.करारानंतर चेअरमन चोई यंग हो यांनी भारतीय विद्यार्थ्यांना कोरियन वेलनेस-ब्युटी उद्योगातील उच्च दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. ली ची रान यांनी, या उपक्रमामुळे भारत-दक्षिण कोरिया शैक्षणिक आणि सांस्कृतिक संबंध अधिक दृढ होतील, असे मत व्यक्त केले. तर प्रा. प्रदीप रोडे यांनी, या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय इंटर्नशिप, प्रगत कौशल्यविकास आणि जागतिक रोजगाराच्या संधी अधिक व्यापक होतील, असे नमूद केले.

या संपूर्ण प्रकल्पाचा समन्वय आयु.नितीन साळवे यांच्या माध्यमातून करण्यात आला. या महत्त्वाच्या क्षणी तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा आयु. दीपा रोडे, डॉ. प्रियांका रोडे, इंजि. दीपंकर रोडे तसेच समूहातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मालेगाव येथील बलात्कार व हत्याकांडातील आरोपींना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे -ॲड. सुभाष राऊत

बीड ।प्रतिनिधी

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील चार वर्षीय चिमुकलीच्या बलात्कार व हत्याकांडाचा वेगवान व नि:ष्पक्ष तपास करून दोषीला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशी मागणी अखिल भारतीय समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड.सुभाष राऊत यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील केवळ चार वर्षांच्या निरागस बालिकेवरील अमानुष अत्याचार आणि हत्या ही मानवतेला कलंकित करणारी घटना आहे. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात प्रचंड संताप उसळला असून कायदा - सुव्यवस्थेवर जनतेचा विश्वास ढासळत चालला आहे. या प्रकरणाचा अत्यंत वेगाने, काटेकोरपणे आणि पूर्णपणे नि:ष्पक्ष तपास व्हावा. दोषी आरोपीला शक्य तितक्या लवकरात लवकर फाशीपर्यंतची कठोरातील कठोर शिक्षा मिळावी. लहान बालकांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांना आळा




**महात्मा फुले समता परिषद आणि श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सव समितीच्यावतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर**

घालण्यासाठी शासनाने ठोस धोरण आखावे. पीडित कुटुंबास तात्काळ मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत व योग्य भरपाई देण्यात यावी. या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालून निष्पाप बालिकेला न्याय मिळवून द्यावा अशी मागणी

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत, श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंतीचे संस्थापक तथा प्रणेते ड. संदीप बेदरे यांनी केली आहे. याप्रसंगी सोनार समाजाचे बाबासाहेब पंडित, समता परिषदेचे शहराध्यक्ष निखिल शिंदे, नितीन राऊत, शरद विटकर, सचिन सातपुते, महेश व्यवहारे, महेश शिंदे, समता परिषदेचे पदाधिकारी, समता सैनिक व सोनार समाजातील नागरिक आदींची उपस्थिती होती.

# टीईटी गैरप्रकार; 'एआय', 'फोटो व्ह्यू'चा वापर होणार

प्रतिनिधी । पुणे

यंदा नव्याने शिक्षक भरतीसाठी असणा-या उमेदवारांसह शिक्षक म्हणून कार्यरत उमेदवारही टीईटी परीक्षा देणार आहेत. त्यामुळे उमेदवारांच्या संख्येत वाढ झाली आहे. वाढलेल्या उमेदवारांमुळे केंद्रांची संख्या देखील वाढवली आहे. या परीक्षेत कोणताही गैरप्रकार होणार नाही यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. बोगस उमेदवारांना ओळखण्यासाठी 'कनेक्ट व्ह्यू, 'फोटो व्ह्यू' आणि हॉटलाइन प्रणालीचा वापर केला जाणार आहे. राज्यभरात येत्या २३ नोव्हेंबर रोजी ही परीक्षा होणार आहे. त्यासाठी परीक्षा केंद्रावर दीड तास आधी रिपोर्टिंग आवश्यक असल्याचे सांगितले आहे.

यंदा नव्याने शिक्षक भरतीसाठी येणा-या उमेदवारांबरोबरच कार्यरत असणा-या शिक्षकांनाही टीईटी परीक्षा अनिवार्य केली आहे. यात फक्त सेवानिवृत्तीला आलेल्या दोन ते तीन वर्षे बाकी असणा-या शिक्षकांना सूट देण्यात आली आहे. ही पात्रता परीक्षा उत्तीर्ण असल्याशिवाय शिक्षकांना पदोन्नतीदेखील मिळणार नसल्याचे शिक्षण विभागाने म्हटले आहे. त्यामुळे यंदा दुप्पट संख्येने शिक्षक पात्रतेसाठी उमेदवार परीक्षेला बसले आहेत. या परीक्षेसाठीची सर्व तयारी पूर्ण झाली असून सोलापुरातील सर्व केंद्रांवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षणाधिकारी कार्यालयातच सहनियंत्रण कक्ष आहे असे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.


कनेक्ट व्ह्यू : सर्व परीक्षा केंद्रे एका कंट्रोल रूमशी जोडून लाइव्ह मॉनिटरिंग केले जातात. कोणतीही संशयास्पद हालचाल त्वरित निदर्शनास येते. यासाठी ती वापरली जाईल असे शिक्षण विभागातील अधिका-यांनी माहिती देताना सांगितले.

हॉटलाइन फोन प्रणालीची सुविधा

सर्व जिल्हाधिका-यांनादेखील पत्र देण्यात आले आहे. सर्व परीक्षा केंद्रांवर सुरक्षित वातावरणात परीक्षा घेण्यासाठी त्वरित संपर्क करता यावा याकरिता हॉटलाइन फोन सर्व केंद्रांवर असतील. डमी उमेदवारांना शोधण्यासाठी फोटो व्ह्यू आणि कनेक्ट व्ह्यूचा, एआयचा वापर केला जाणार असल्याची माहिती परीक्षा परिषद आयुक्त डॉ. नंदकुमार बेडसे यांनी दिली आहे.

प्रतिनिधी । लातुर

जिल्ह्यातील ३२ परीक्षा केंद्रांवर २३ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा सन २०२५-२६ आयोजित करण्यात आली आहे. सकाळच्या सत्रात २१ परीक्षा केंद्रावर व दुपारच्या सत्रात ३२ परीक्षा केंद्रावर परीक्षेचे नियोजन करण्यात आले आहे. पेपर-१ करिता सकाळी १०.३० ते १ या सकाळच्या सत्रात ९ हजार ३४६ व पेपर-२ करिता पेपर-२ दुपारी २.३० ते ५ या वेळेत दुपारच्या सत्रात १२ हजार ५८९ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. सर्व परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमरे बसविण्यात आलेले आहेत. परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांची



सकाळी ९ पासून फ्रिस्कींगद्वारे तपासणी केली जाणार आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी वेळेवर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असून कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडणार नाही, यासाठी सर्व परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांनी वेळवर उपस्थित रहावे,

# सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पाणी व मालमता धारकांनी ८०% सूट

## योजनेचा लाभ घेत ५४ लक्ष ५४ हजार ४९३ रूपयांची केली वसुली...

नांदेड ।प्रतिनिधी

नावामनपाच्या वतीने आयोजित दि २१ नोव्हेंबर रोजी एकदिवसीय पाणी व मालमता करा पोटी ८०%सूट योजनेचा लाभ घेत सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्रमांक १९ व २० मधील जवळपास २८५ मालमत्ता धारकांकडुन ५४ लक्ष ५४ हजार ४९ ३ रुपये नगदी,धनादेश,ऑनलाईन रक्कम व्दारे मालमत्ता व पाणी पट्टी कर जमा केला असुन,मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे व उपायुक्त गिरीष कदम अजितपाल सिंघ संधू यांनी सिडको क्षेत्रीय कार्यालय सहाय्यक आयुक्त मिर्झा बेग,कार्यालयीन अधीक्षक विलास गजभारे कर निरीक्षक,वसुली लिपीक व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.




मनपाच्या सहा क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत दि २१ नोव्हेंबर २०२५ रोजी एक दिवसासाठी थकीत मालमत्ता धारक यांच्या साठी पाणीपट्टी व मालमत्ता करावर ८० % सुट जाहीर करण्यात आली होती,या अनुषंगाने मनपा आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम,सुंकेवार यांच्या मार्गदर्शना खाली उपायुक्त अजितपाल सिंघ संधू व सिडको क्षेत्रीय कार्यालय सहाय्यक आयुक्त मिर्झा बेग यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयीन अधीक्षक विलास गजभारे व वरीष्ठ लिपीक लांडगे,आठवले,कर

निरीक्षक व वसुली लिपीक यांनी थकबाकी दार मालमत्ता धारक यांच्या कडे वसुली करून करण्यात आली नावामनपाचा सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्रमांक १९ व २० मधील जवळपास मालमत्ता धारका कडून नगदी व धनादेश ५४ लक्ष ५४ हजार ४९३ रुपये वसुली झाली यासाठी कर निरीक्षक संजय नागापूरकर,मारोती सारंग,सादुल्ला खान,वसंत कल्याणकर यांच्या मार्गदर्शना खाली ,वसुली लिपीक मालु एनफळे,विवेकानंद लोखंडे,ऊतम जोंधळे,नथुराम चौरे रविंद्र पवळे, सुधीर कांबळे,राहुल पाईकराव,रमेश यशवंतकर,दिपक जोंधळे, कोल्हे, मदनसिंह बैस, नरेंद्र शिंगे, भंडारे यांनी सकाळ पासून थकीत मालमत्ता धारक यांच्याशी संपर्क साधून रोख व धनादेशव्दारे एक कोटी रुपयांच्या पाणीपट्टी व मालमत्ता कर वसूल केला आहे.मनपा आयुक्त व वरीष्ठ अधिकारी यांनी क्षेत्रीय कार्यालय अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.



# तामसा जिल्हा परिषद गटात डॉ. दीपक नाईक यांचा प्रत्यक्ष गाव भेटीवर भर...

तामसा ।प्रतिनिधी

आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण हदगाव तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. विविध पक्षांच्या इच्छुक उमेदवारांनी गावोगावी गाव भेटी वर भर देत जनसंपर्क मोहीम उघड केली असून मतदारांची मने जिंकण्यासाठी सर्वच जण कंबर कसल्याचे चित्र दिसत आहे. तामसा जिल्हा परिषद गटातून भाजपाचे इच्छुक उमेदवार डॉ. दीपक नाईक यांनी मोठ्या प्रमाणात तयारीला लागले असून अक्षरशः त्यांनी वाडी - तांडे आणि प्रमुख गावांत जाऊन गाव भेटी वर जोर दिला असून. प्रत्येक कुटुंबाशी संवाद साधत त्यांच्या आडी अडचणी जाणून घेण्यावर त्यांनी विशेष मोठया प्रमाणात भर

दिला आहे. या दौऱ्यादरम्यान डॉ. नाईक यांच्या सोबत तरुण कार्यकर्त्यांची एक सशक्त फळी उभी राहिल्याचे स्पष्ट दिसत असून, विशेषतःसुशिक्षित, तरुण वर्ग,व्यापारी उद्योजक बरोबर उच्च शिक्षित डॉ. संदीप कारंजकर, मेडिकल व्यवसायिक महेश मठपती, तालुका उपाध्यक्ष शशिकांत बंडावार, यांच्यासह अनेक कार्यकर्ते उत्साहाने जनसंपर्कात सहभागी होत आहेत. भाजपाकडून इच्छुक असलेल्या डॉ. नाईक यांचा ग्रामीण भागातला प्रत्यक्ष संपर्क, नम्र संवादशैली आणि कार्यकर्त्यांची साथ यामुळे त्यांच्याबाबतचे राजकीय समीकरण अधिक रोचक बनले आहे. आगामी निवडणुकीत तामसा गटातील संघर्ष अधिकच रंगतदार होण्याची चिन्हे दिसत आहेत.



# स्वा.म.म. तालुकाध्यक्षपदी कोंडीबा सुर्यवंशी,युवा तालुकाध्यक्षपदी विठ्ठल काकडे यांची निवड

अर्धापूर (प्रतिनिधी)

स्वाभिमानी मराठा महासंघाच्या अर्धापूर तालुकाध्यक्ष पदी कोंडीबा सुर्यवंशी तर युवा तालुकाध्यक्ष पदी विठ्ठल काकडे यांची निवड करण्यात आली असल्याचे पत्र पाठवून कळविले आहे. स्वाभिमानी मराठा महासंघाच्या संस्थापक अध्यक्ष डॉ. कृषिराज टकले यांनी सक्रिय कार्यकर्ते यांच्या कार्याची दखल घेऊन स्वाभिमानी मराठा महासंघाच्या तालुकाध्यक्ष पदी कोंडीबा सुर्यवंशी यांची तर युवा तालुकाध्यक्ष पदी विठ्ठल काकडे यांची निवड केल्याबद्दल भाजप जिल्हा उपाध्यक्ष नागोराव भांगे, पत्रकार सखाराम क्षीरसागर, पत्रकार गंगाधर सोनटक्के,भाजयुमोचे माजी तालुकाध्यक्ष जठन मुळे,आनंद वैद्य,कुश भांगे,कोंडीबा हाके,व्यंकटी कणगीरे यांनी सत्कार करून अभिनंदन केले व भावी कार्यास शुभेच्छा दिल्या.

# शिक्षण व आरोग्य क्षेत्र एकत्र येणार; स्वारातीम विद्यापीठ व डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय यांच्यात ऐतिहासिक करार

नांदेड ।प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्यात विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासह शैक्षणिक व संशोधनात्मक देवाणघेवाण मजबूत करण्यासाठी एक ऐतिहासिक सामंजस्य करार संपन्न झाला आहे. शिक्षण व आरोग्य क्षेत्राचे हे अभिनव एकत्रीकरण दोन्ही संस्थांच्या विद्यार्थी, संशोधक आणि अध्यापकवर्गासाठी नव्या संधींचे दार उघडणारे ठरणार आहे. या कराराचा प्रमुख उद्देश शैक्षणिक बहुविधता, व्यावहारिक आरोग्यसेवा आणि तांत्रिक प्रगतीला गती देणे हा आहे. करारांतर्गत खालील प्रमुख क्षेत्रांत सहकार्य होणार आहे: दोन्ही संस्थांमधील वैज्ञानिक संबंध व शैक्षणिक सहकार्य वृद्धिंगत करणे संयुक्त ऑनलाइन इ-सामग्री




आणि अभ्यास साहित्य विकसित करणे विद्यार्थ्यांसाठी ऑन-दी-जॉब ट्रेनिंग (जगढ), अप्रेंटिसशिप व इंटर्नशिप संधी उपलब्ध करणे समान विषयक्षेत्रातील अभ्यासक्रम विकासाला चालना परिसंवाद, कार्यशाळा आणि शैक्षणिक बैठकांमध्ये संयुक्त सहभाग विविध विषयांवरील संयुक्त संशोधन प्रकल्प राबविणे अभ्यासक्रमामध्ये बहुविषयक पद्धतीचा समावेश या सहकार्याचा एक विशेष पैलू म्हणजे एसआर टी एम यू च्या ललित कला विभागाचे आरोग्यशास्त्राशी होणारे एकत्रीकरण, ज्यातून मानसिक व शारीरिक आरोग्य संवर्धनाचा नवीन शैक्षणिक दृष्टिकोन विकसित होणार आहे. दोन्ही संस्थांनी शिक्षक व संशोधकांमध्ये सातत्यपूर्ण संवाद आणि नियमित बैठका घेऊन या कराराची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याचे आश्वासन दिले आहे.या वेळी विद्यापीठातर्फे कुलगुरू डॉ मनोहर चासकर कुलसचिव डॉ डी डी पवार प्रा. एम. के. पाटील - डीन, सायन्स अँड टेक्नॉलॉजी, प्रा. एस. जे. वाढेर - डीआयआयएल, प्रा. जी. कृष्ण चैतन्य - संचालक, सीआयसीएमआरआय डॉ. बी. एस. रेड्डी - संचालक, आयक्यूएसी डॉ. अशोक कदम - जनसंपर्क अधिकारी यांची उपस्थिती होती तर डॉ शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, डॉ. शितल राठोड, डॉ उमेश अथ्राम यांची प्रमुख उपस्थिती होती. या कराराची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यात प्रा. जी. कृष्ण चैतन्य, प्रा. एस. जे. वाढेर आणि प्रा. टी. ए. कदम यांचे विशेष योगदान राहिले.

# निरोगी, सुदृढ आणि आरोग्य केंद्रित समाज निर्मितीसाठी आरोग्य दूत उपक्रम

## मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांचे प्रतिपादन

नांदेड ।प्रतिनिधी

प्रतिनिधी किशोरवया पासूनच आरोग्याची काळजी व जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषदेच्या वतीने आरोग्य दूत हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. निरोगी, सुदृढ आणि आरोग्य-केंद्रित समाज निर्मितीसाठी हा उपक्रम प्रभावी ठरेल, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या सभागृहात आज मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, सीएम फेलो भार्गवी मुंढे, जिल्हा कृषी अधिकारी निलकुमार ऐतवडे, सहाय्यक आयुक्त



पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार घुले, माता-मुल संगोपन अधिकारी डॉ. शिवशक्ती पवार, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, सहाय्यक संचालक कुष्ठरोग नियंत्रण अधिकारी डॉ. शेख बालन, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतिश कोरपूरवा आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे त्या म्हणाल्या, आरोग्य दूत उपक्रमात इयत्ता सहावी ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सहभाग राहणार आहे. प्रत्येक गावातून एका विद्यार्थ्याची निवड करण्यात आली आहे. आरोग्याची काळजी, प्राथमिक उपचार, आजार होण्याआधी प्रतिबंधात्मक उपाय, वाढता ताणतणाव, संतुलित व सकस आहार आदी विषयांचे प्रशिक्षण या विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

या उपक्रमात आरोग्य विभागाबरोबरच कृषी, पशुसंवर्धन तसेच पाणी व स्वच्छता विभागाचाही सहभाग राहणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर हे प्रशिक्षित मुलं-मुली आरोग्यदूत म्हणून आपल्या गावात व समाजात जनजागृती करून निरोगी कुटुंब आणि आरोग्यमय आयुष्य घडविण्यास हातभार लावतील, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी व्यक्त केला. आरोग्य दूत हा उपक्रम नांदेड जिल्ह्याच्या आरोग्यसेवेत दूरगामी व सकारात्मक बदल घडविणारा ठरेल, असेही त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी रेनुका दराडे यांनी तर आभार प्रदर्शन वैशाली बेरलीकर यांनी केले.

# हिमायतनगर नगरपंचायत विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढविणार :-डॉक्टर राजेंद्र वानखेडे

हिमायतनगर ।प्रतिनिधी

आगामी होणाऱ्या नगरपंचायत निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचार शुभारंभ आज दिनांक २२ नोव्हेंबर रोजी श्री परमेश्वर मंदिर येथून करण्यात आला या प्रचार शुभारंभाच्या कार्यक्रम प्रसंगी भाजपा नेते डॉ.अंकुश देवसरकर,गिरीश जाधव, डॉ. प्रसाद डोंगरगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री परमेश्वर महाराजांची महापूजा व आरती करून अनेक मान्यवरांच्या हस्ते नारळ श्रीफळ फोडून या नगरपंचायत निवडणुकीचा प्रचार शुभारंभ करण्यात आला प्रचार शुभारंभाच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या भाजपाच्या पदयात्रेला मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला रॅलीच्या मार्गावर विविध मंदिरासह अनेक ठिकाणी श्रीफळ फोडण्यात आले जागोजागी भाजपा नगराध्यक्ष पदाचे उमेदवार असलेले डॉक्टर राजेंद्र वानखेडे यांचे मतदारांनी स्वागत करून त्यांना उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला त्यामुळे शहरातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे



## देशात नरेंद्र,महाराष्ट्र देवेंद्र व हिमायतनगरात राजेंद्र चा बोलबाला

या बाबत सविस्तर व्रत असे कि हिमायतनगर नगर पंचायत निवडणूक कार्यक्रमाचा आज दि २२ नोव्हेंबर रोजी भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष पदा सह सर्व उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ कार्यक्रम प्रसंगी बोलताना डॉ. वानखेडे यांनी असे सांगितले की आगामी होणाऱ्या नगरपंचायत निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टी विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढविणार आहे मला एन वेळी उमेदवारी मिळाल्यामुळे सर्वच्या सर्व जागी उमेदवार उभे करता आले नाही याची खंत आहे पण सोबत असलेल्या सर्व सहकाऱ्यांना घेऊन जनसेवे सोबत आरोग्य सेवेत सुद्धा काम करत मी हिमायतनगर शहरात विकासाच्या मुद्द्यावर ही निवडणूक लढविणार आहे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा भाजपा नेते खासदार अशोकराव चव्हाण हे या निवडणुकीत विशेष लक्ष देऊन हिमायतनगर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी ते रोल मॉडेल ठरणार आहेत व हिमायतनगरच्या विकासाची ब्ल्यू प्रिंट भारतीय जनता पार्टीकडे तयार आहे अनेक विकासाच्या मुद्द्यावर येथील नगरपंचायत निवडणूक लढविली जाणार आहे कुठल्याही जातीपातीचा मतभेद न करता ही निवडणूक लढवून आम्ही जिंकणार आहोत आम्हाला कुठल्याही विरोधकांचे आव्हान नाही असे सांगत डॉक्टर राजेंद्र वानखेडे यांनी विकास कामाच्या आधारावर भारतीय जनता पार्टीचा विजय निश्चित असल्याचे सांगितले

यावेळी उपस्थित डॉक्टर अंकुश देवकर गिरीश जाधव डॉक्टर प्रसाद डोंगरगावकर भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष गजानन चायल,शहराध्यक्ष विपुल दंडेवाड, शरद चायल, नागेश डूडूळे, परमेश्वर सातव, अनिल शामराव माने, पंकज मुधोळकर, आशिष सकवान, भारत डाके, रामेश्वर सूर्यवंशी, दुर्गेश मांडोजवार,सह असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# बरबडा येथे ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहा चे आयोजन

नायगाव ।प्रतिनिधी

नायगाव तालुक्यातील बरबडा येथील श्री येताळेश्वर मंदिरामध्ये श्री ज्ञानेश्वरी पारायण, राम कृष्ण हरी जप व अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमाची शृंखला दि २१ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर दरम्यान भक्तिमय वातावरणात आयोजित करण्यात आली आहे. सलग ३० वर्षांची परंपरा असलेल्या या सप्ताहामध्ये दररोज विविध किर्तनकारांचे प्रवचन, भजन, हरिपाठ तसेच रात्री हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा भजन. त्यानंतर सकाळी ७ ते ८ रामकृष्ण हरी जप आणि सकाळी १० ते १२ गाथा भजन, संध्याकाळी ५ ते ६ हरिपाठ तर रात्री ८.३० ते १०.३० हरिकीर्तन यांचा समावेश आहे.या सप्ताहासाठी खालील मान्यवर कीर्तनकार ह.भ.प. श्रीधर महाराज कासराळीकर,ह.भ.प. किशन महाराज बरबडेकर,ह.भ.प. बालाजी महाराज गुडेवार नांदेड,ह.भ.प. गंगाधर महाराज हंबर्डे दरेगावकर,ह.भ.प. कु. वेदिका आलेवार बरबडेकर,ह.भ.प. डॉ. दत्ता महाराज वळशींगे वळसंगवाडीकर ह.भ.प. गोपीचंद शास्त्री सारसेकर यांची कीर्तनसेवा आयोजित केली आहे. भजनी मंडळाचे गायक ह.भ.प. श्रीधर पाचाळ, बबलू पाचाळ व धोंडीबा चिवटेवाड यांचेही योगदान लाभणार आहे. कार्यक्रमाचे मृदंगाचार्य ह.भ.प. दामोदर भारती असून भक्तिपर कार्यक्रमांच्या माध्यमातून श्रद्धाळूंना अध्यात्मिक उन्नतीचा अनुभव मिळणार आहे. या सप्ताहाचे आयोजन श्री गणेश भजनी मंडळ व समस्त गावकरी मंडळ, बरबडा यांच्या वतीने करण्यात आले असून, एन. एम. तिप्पलवाड (एन टी सर) यांनी सर्व ग्रामस्थ व भक्तांना सप्ताहात सहभागी होऊन हरिनामाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.



भोकर ।प्रतिनिधी

आज रोजी पोलीस स्टेशन भोकर येथील ६ गुन्ह्यातील प्रतिबंधित अन्नपदार्थ प्रकरणातील मुद्देमाल गुटखा किंमत ६६४६२७०/ रुपयाचा मुद्देमाल मा. न्यायालय प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालय भोकर यांच्या नष्ठ करण्याच्या परवानगी आदेशान्वये आ.मा.तमडवार अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य नांदेड यांच्या मार्फतीने पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक अजित कुंभार साहेब, सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेंद्र आवटे, म.पोहेका/२५६८ वच्चेवार पोका/आरेवार पोका/गाडेकर व इतर नगरपालिका कर्मचारी यांच्या सहाय्याने दोन पंचाचे समक्ष विश्लेषणासाठी पाठविलेल्या मुद्देमाला व्यतिरिक्त इतर सर्व मुद्देमाल हनुमान नगर डम्पिंग डॅम येथे नेऊन मोकळ्या जागेत जाळून नष्ठ करण्यात आला आहे. सदर मुद्देमाल नष्ठ करतेवेळी सुरुवातीपासून शेवटपर्यंत छायाचित्रीकरण करण्यात आले गुटका नष्ठ कार्यवाही ११.२८ वाजता सुरू करून १५. ५१ वाजता संपविली.

पोलीस स्टेशन भोकर अभिलेखा वरून ६ गुन्हयातील गुटखा नष्ठ करून सदर गुन्हे अभिलेखावरून कमी करण्यात आले आहेत.